


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३१ ■ शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

होली की पिचकारी

होली कलर, पिचकारी, गुलाल, फायरोपॉक, फॉक, एअर बलून गन, बलुन, फॅन्सी मास्क, टैग में वैराइटी गुलालगंज इलेक्ट्रॉनिक गण, इलेक्ट्रॉनिक टॅग, गुलाल, गुलाल सिलेंडर, हेअर माक्स/ब्लॅक हेअर ,मलींगा कॅप, टी शर्ट, टॅक मे व्हेरायटी, क्रिकेटर

होलसेल भाव में चिल्लर उपलब्ध.

दीपक ट्रेडिंग कंपनी

शॉप नं. ६८, जी.एम.डी. मार्केट, राम नगर, अकोला.

# अमेरिका व इस्त्रायलचा इराणवर संयुक्त हल्ला !

## सर्वोच्च नेते खामेनींना सुरक्षित ठिकाणी हलवले





वृत्तसंस्था २८ फेब्रुवारी

**तेहरान:** इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर हल्ला केला आहे. भारतीय वेळेनुसार, शनिवारी सकाळी तेहरानसह अनेक शहरांमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत आणि हवाई हल्ल्यांचे सायरन वाजत आहेत.

इस्त्रायली डिफेन्स फोर्सने इराणवरील हल्ल्याची माहिती देताना याला 'प्रतिबंधात्मक हल्ला' (प्रिव्हेंटिव्ह अटॅक) म्हटले आहे. हल्ल्यानंतर इराणने सर्व उड्डाणे थांबवली आहेत आणि हवाई हद्द रिकामी केली आहे. इकडे इस्त्रायलमध्येही हवाई हल्ल्याचे सायरन ऐकू येत आहेत. संवेदनशील परिसर रिकामे केले जात आहेत. लोकांना घरातच राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.तर, अल जझीराने अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने सांगितले की, ही अमेरिका आणि इस्त्रायलची संयुक्त लष्करी कारवाई आहे. या अंतर्गत इराणचे सर्वोच्च नेते खामेनेई यांच्या कार्यालयाजवळ हल्ला करण्यात आला. हल्ल्यानंतर खामेनेई यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. इस्त्रायलने इराणविरुद्धच्या आपल्या नवीन मोहिमेला 'लायन्स रोर' (सिंहाची गर्जना) असे नाव दिले आहे. हे नाव इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी निश्चित केले आहे. असे सांगण्यात आले आहे की, सैन्याने या हल्ल्यासाठी आधी दुसरे नाव ठेवले होते.हा हल्ला इराण आणि अमेरिकेदरम्यान अणुबॉम्बच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ल्याची धमकी दिली होती. शुक्रवारी अमेरिकेने आपल्या नागरिकांना तत्काळ इस्त्रायल सोडण्यास सांगितले होते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची धमकी दिली होती. अमेरिकेच्या सैन्याने इराणला आधीच चोहोबाजूंनी वेढले आहे. यापूर्वी शुक्रवारी अमेरिकेने आपल्या नागरिकांना तात्काळ इस्त्रायल सोडण्यास सांगितले होते.इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या अणुकराराच्या चर्चेत बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रकल्प हा सर्वात मोठा वादाचा मुद्दा बनला आहे. इराण यावर अजिबात तडजोड करण्यास तयार नाही आणि याला आपली 'रेड लाईन' मानतो.इराणचे म्हणणे आहे की, त्याचा बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रम संरक्षणासाठी आवश्यक आहे. इराणचे म्हणणे आहे की, जून २०२५ मध्ये इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणच्या अणु ठिकाणांवर हल्ला केला, तेव्हा इराणच्या क्षेपणास्त्रांनीच त्याचे संरक्षण केले.इराणी अधिकाऱ्यांनी वारंवार सांगितले आहे की, क्षेपणास्त्र कार्यक्रमावर कोणतीही चर्चा होणार नाही. ही इराणची बचावात्मक क्षमता आहे आणि ती सोडणे म्हणजे स्वतःला कमकुवत करणे होय. इराण म्हणतो की, चर्चा केवळ अणुकार्यक्रमापुरती मर्यादित राहील, क्षेपणास्त्र किंवा प्रादेशिक गटांवर नाही.

### ट्रम्प म्हणाले, 'अमेरिकन सैन्य इराणची क्षेपणास्त्रे नष्ट करत आहे'

ट्रम्प म्हणाले की, इराणमधील अमेरिकेची लष्करी कारवाई मोठी आणि सतत सुरू आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि त्यांच्या लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्य इराणची क्षेपणास्त्रे नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम संपवण्याचा प्रयत्न करत आहे.त्यांनी असेही म्हटले की जूनमध्ये इराणच्या अणुसुत्रांवर हल्ला झाल्यानंतरही, इराण अजूनही आपला अणुकार्यक्रम पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प म्हणाले की इराणने आपला अणुकार्यक्रम सोडण्याची कोणतीही संधी घेतलेली नाही, म्हणून आता जास्त वाट पाहण्याची गरज नाही.ट्रम्प म्हणाले की इराणमध्ये सुरू असलेल्या लष्करी कारवाईदरम्यान काही अमेरिकन सैनिकांना आपले प्राण गमवावे लागू शकतात. त्यांनी म्हटले की युद्धामुळे जीवितहानी होऊ शकते, परंतु भविष्यातील सुरक्षेसाठी हे पाऊल उचलले जात आहे.

# त्या रस्त्याचा भ्रष्टाचार दाबण्यासाठी मलमपट्टी

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना बदनाम करण्याचे षडयंत्र कोणाचे




प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला :** राज्याचे मुख्यमंत्री यांच्या नावाने असलेल्या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत मुख्यमंत्री यांना बदनाम करण्याचे षडयंत्र कोणाचे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. २२ जानेवारी रोजी सिटी न्यूज सुपरफास्ट ने बातमी प्रकाशित केल्यानंतर या रस्त्यावर मलमपट्टी सुरु केली असून ती मलमपट्टी उपयोगी नसून पुर्ण सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता नव्याने करण्याची गरज आहे. रस्ता तयार झाल्यापासून सहा महिन्यात त्यांची वाट लागली असून या प्रकरणात मुख्यमंत्र्यांना बदनाम करण्याचा कोणी जाणीवपुर्वक प्रयत्न तर करत नाही ना अशी विचारणा होत आहे. या रस्त्याच्या भ्रष्टाचार प्रकरणात संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गुंतले असून त्यांना निलंबित करत रस्त्याची स्वतंत्र चौकशी गरजेची आहे. इतकेच नाही तर जो पर्यंत हा रस्ता नव्याने होत नाही तो पर्यंत संबंधित कंत्राटदाराला ब्लॅक लिस्टेट का केले जात नाही, अशी विचारणा स्थानिकांनी केली आहे. या मार्गावर शेकडो वाहने धावतात त्यांचा या निकृष्ट रस्त्यामुळे अपघात झाला, जीव गेल्यास कोणावर गुन्हा दाखल करावा अशी विचारणा आता सुरु झाली आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत राज्य मार्ग ६ वर बाभुळगाव–गुडधी–अलियाबाद–घुसर या १०.७५० कि.मी. लांबीच्या रस्त्याचा दर्जा पुर्णतः निकृष्ट असल्याचे या रस्त्यावरच्या एकूण कामावरुन दिसून येते. या कामावर देखरेख करणारे अधिकारी आणि अभियंता यांनी कर्तव्यात कसुर केल्याचे चित्र असून कंत्राटदाराला झुकते माप देणाऱ्या अभियंत्यांची विभागीय चौकशी ग्राम विकास विभाग का लावत नाही अशी विचारणा होत आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार पुर्ण झालेल्या सिमेंट रस्त्यावर शेकडो ठिकाणी भेगा पडल्या असून त्यावर केमिकलची मलमपट्टी केल्याचे चित्र सुमार दर्जाच्या कामाची पावती देत आहे. सिटी न्यूज सुपरफास्टने २२ जानेवारी रोजी या विषयीची बातमी प्रकाशित केल्यानंतर पुन्हा नव्याने या रस्त्यावर मलमपट्टी सुरु झाली आहे. पण, ती कामाची नसून पुर्ण रस्त्याचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची गरज आहे. यासाठी त्रयस्थ संस्था नियुक्त करण्याची गरज आहे. इतकेच नाही तर रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे प्रथम दर्शनी दिसत असून सरकारी निधीचा गैरवापर आणि लुट या प्रकरणात अधोरेखित झाली असताना ग्राम विकास विभाग यात हयगय का करत आहे अशी विचारणा होत आहे.

### जिल्हाधिकारी करतील काय रस्त्याची पाहणी

जिल्हाधिकारी वर्षा मिना यांनी आम जनतेच्या पैशातून, करातून झालेल्या निकृष्ट रस्त्याची पाहणी करण्याची गरज आहे. कशा प्रकारे कोट्यावधीच्या रस्त्याची अवस्था झाली असून यास जबाबदार असलेल्या प्रत्येक घटकाची जबाबदारी निश्चित करत कारवाईची गरज व्यक्त केली जात आहे. संपुर्ण कामासाठी वापरलेल्या साहित्याचे मोजमाप त्याच बरोबर साहित्यांच्या गुणवत्तेची दक्षता व गुणवत्ता विभागाने चौकशी करण्याची गरज आहे. राज्याच्या ग्राम विकास विभागाने अकोल्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची पाळमुळे खोदण्याची गरज व्यक्त केली जात आहे. सुमारे २१ कोटींच्या रस्त्याची चौकशी करण्याची गरज आहे.

### लक्षवेधी लागल्यास मोठ्या अडचणी येणार

या प्रकरणातील काही कागदपत्रे ,बातमी ही मुंबईतील राजकीय वर्तुळात चांगलीच फिरली असून २१ कोटींच्या रस्त्याचा भ्रष्टचारावर ग्राम विकास विभाग काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले असून पुढील आठवड्यात या विषयावर एल ए क्यु लागल्यास ग्राम विकास विभागाचे मुंबई स्थित वरिष्ठ अधिकारी अडचणी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इतकेच नाही तर संबंधित कंत्राटदार ब्लॅक लिस्टेड करण्यासाठी स्थानिक पातळीवरील अभियंता यांनी हेतुपुरस्सरपणे डोळेझाक का केली अशी विचारणा होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आता लग्नसजावटीत प्लास्टिक फुले वापरणे पडणार महागात !

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**मुंबई :** नैसर्गिकरीत्या विघटन न होणाऱ्या प्लास्टिक फुलांच्या विक्रीवर राज्यात पूर्वीपासूनच बंदी आहे. ही बंदी अधिक स्पष्ट, परिणामकारक आणि कठोर करण्यासाठी लवकरच स्वतंत्र शासन निर्णय (जीआर) काढण्यात येईल. तसेच, या निर्णयामध्ये केवळ प्लास्टिक फुलांचे उत्पादन व विक्रीच नव्हे, तर सजावटीसाठी त्यांचा वापर करणारे डेकोरेटर देखील शिक्षेस पात्र असतील. तसेच मोठे हॉल जे अशा डेकोरेशनला परवानगी देतील, त्यांच्यावरही कारवाईची तरतूद या जीआरमध्ये असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली.

राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आ. जयंत पाटील यांनी मुंबई महानगरपालिकेने दादर फुल मार्केटमधील फुल विक्रेत्यांना अतिक्रमणाच्या नावाखाली तिथून हटवले आहे. त्यामुळे मुंबई फुल विक्रेता असोसिएशने बंद पुकारला असून सध्या फुलविक्री पूर्णपणे बंद असल्याचे सांगत हा बंद मागे घेण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची मागणी केली.

CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र

मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)

-:संपर्क:- सिध्दार्थ दामोधरे अमरावती मो.9545000880

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278

# दहावीच्या परीक्षेदरम्यान विद्यार्थिनीची प्रसूती !

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**धार (मध्य प्रदेश) :** दहावीची परीक्षा देणाऱ्या एका १७ वर्षीय विद्यार्थिनीने परीक्षेदरम्यान एका मुलाला जन्म दिल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी येथे घडली. प्रसूतीकाळ पूर्ण होण्यापूर्वीच ही प्रसूती झाली असून, ही मुलगी व नवजात अर्भक दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. ही मुलगी अल्पवयीन असल्याने या प्रकरणाची पोक्सो अंतर्गत चौकशीची शक्यता आहे.

येथील पीथमपूरमधील एका खासगी शाळेत ही घटना घडली. शुक्रवारी, तेथे दहावीची गणिताची परीक्षा घेण्यात आली. परीक्षा सुरू झाल्यानंतर दोन तासांनी या मुलीच्या पोटात भयंकर कळा आल्याने स्वच्छतागृहात जाऊ देण्याची विनंती तिने पर्यवेक्षकांकडे केली.

# अकोला पोलिसांच्या प्रोजेक्ट त्रीनेत्रची राष्ट्रीय स्तरावर निवड !

## एसपी अर्चित चांडक यांचे नवी दिल्ली येथे प्रोजेक्ट सादरीकरण

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला:** अकोला पोलिस दलाच्या प्रोजेक्ट त्रिनेत्रची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अकोल्याचा गुणवंत युवक किशन पनपालिया यांच्या संयुक्त नेतृत्वातून साकारलेला, अकोल्यातील सर्वाधिक प्रभावी उपक्रमांपैकी एक मानला जाणारा 'प्रोजेक्ट त्रीनेत्र' आता राष्ट्रीयस्तरावर झेपावला आहे. जिल्ह्यासाठी ही अभिमानास्पद बाब आहे.

६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा-२०२५ इव्हेंट करीता एनसीआरबी, नवी दिल्ली यांना महाराष्ट्र घटकाकडून



यापूर्वी पाच आय.टी. प्रोजेक्ट पाठविण्यात आले होते. त्यामधून 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट स्पर्धे साठी महाराष्ट्राच्या वतीने 'प्रोजेक्ट त्रीनेत्र' प्रकल्पाची निवड करण्यात आली आहे. प्रोजेक्टचे सादरीकरण दिल्ली येथे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले. राष्ट्रीय स्तरावरील निवड समितिने प्रोजेक्ट त्रीनेत्रची एआय बेस संकल्पना व सादरीकरणाची प्रशंसा करून अर्चित चांडक यांचे कौतुक केले.

अकोला जिल्ह्यातील गंभीर स्वरूपाचे गुन्हे रोखण्यात अकोला पोलीसांना यश आले आहे. तसेच त्रीनेत्र च्या देखरेख व नियंत्रणामुळे अकोला पोलिसांनी मोक्का अंतर्गत सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर कारवाई , एमपीडीए कायद्यान्वये २१ गुन्हेगारांना स्थानबद्ध केले असून कलम ५५ ते ५७ मपोका कायद्यान्वये ७३ गुन्हेगारांना अकोला शहरातून तडीपार करणे शक्य झाले आहे.

# शिखर बँक घोटाळा प्रकरण बंद !

## अजितदादांना क्लीन चिट, सुनेत्रा पवारांच्या अडचणी दूर

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससी बँक) या राज्याच्या शिखर सहकारी बँकेत कर्जाचे वितरण करताना सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याच्या आरोपांच्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांना क्लीन चिट देणारा 'सी-समरी' अहवाल विशेष एसीबी न्यायालयाने शुक्रवारी स्वीकारला. यामुळे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या गुन्ह्याचे प्रकरण कमकुवत होणार असल्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याही अडचणी दूर होण्याची चिन्हे आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी विशेष एसीबी न्यायालयाचा हा महत्त्वाचा निर्णय आला आहे. 'गुन्हेगारी प्रकरण दिसत नाही', असे निरीक्षण नोंदवत न्यायाधीश महेश जाधव यांनी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचा (ईओडब्ल्यू) 'सी-समरी' अहवाल स्वीकारला. तसेच या अहवालाच्या विरोधातील ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, माजी आमदार माणिकराव जाधव, दिवंगत माजी मंत्री शालिनीताई पाटील यांच्यासह अनेकांनी केलेल्या जवळपास ३० 'प्रोटेस्ट' याचिका न्यायालयाने फेटाळल्या, शिवाय ईडीचा हस्तक्षेप अर्जही फेटाळला. विशेष म्हणजे 'ईओडब्ल्यू'च्या गुन्ह्याच्या आधारावर ईडीने गुन्हा दाखल केला आहे. त्यात साताऱ्यातील जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या खरेदीतील कथित गैरव्यवहारावरून ईडीने सुनेत्रा पवार यांचाही आरोपपत्रात उल्लेख केला आहे. या आरोपपत्राची दखल घेऊन विशेष पीएमएलए न्यायालयाने पूर्वी सुनेत्रा पवार यांच्याविषयीही गंभीर निरीक्षण नोंदवले होते. त्यामुळे त्या अडचणीत आल्या होत्या. त्यांच्याप्रमाणेच रोहित पवारही अडचणीत आले होते. कारण बारामती ॲग्रो कंपनीच्या कथित गैरव्यवहारांवरून ईडीच्या आरोपपत्राची दखल घेत पीएमएलए न्यायालयाने त्यांनाही समन्स बजावले होते.

# जलसंधारणाच्या कामात मुरले पाणी,अधिकारी अडचणीत

## जलसंधारणाची कामे मॅनेज, लक्षवेधीने अडचणी
## डी.डी.एक कामे अनेक चौकशी करण्याची गरज

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला:** मुख्यमंत्र्यांच्या सडक योजनेतील अनियमितता समोर आली असताना आता जिल्ह्यात पंतप्रधानांच्या नावाच्या योजनेतील अनियमितता अधोरेखित होताना दिसत आहे. पाणलोट समितीच्या ठरावाच्या आधारावर कामे करण्याची गरज आहे. असे असताना जिल्हा जलसंधारण विभागाने आधी कामे केली आता पाणलोट समितीच्या अहवालांसाठी विभागाचे कर्मचारी राम राम करत आहे. टेंडर मॅनेज करत भ्रष्टाचाराचे पराग कण अधिकाऱ्यांपर्यंत पोहचविले जात आहे. संगणक चालकाची भूमिका या सर्व प्रकरणात तपासण्याची गरज असून डी.डी.एक आणि वेगवेगळ्या कंत्राटदारांचे कामे अनेक असा प्रकार येथे झाला काय याची चौकशी होण्याची गरज आहे. या विषयीच्या निविदा विभागाच्या संकेत स्थळावर प्रसारीत न करता जास्त खपाच्या दैनिकात प्रकाशित न करता कधी ही न दिसणाऱ्या दैनिकात प्रकाशित करत टेंडर मॅनेज करण्याचा प्रयत्न केला कोणी अशी विचारणा होत आहे. या विषयाची एक लक्षवेधी विधीमंडळात लागली असून त्याचा धसका जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतला आहे. या प्रकरणाची चौकशी जिल्हाधिकारी करतील काय अशी विचारणा आता सुरु झाली आहे. त्याच बरोबर जलसंधारणाची ही कामे खरोखर झाली की नाही याची देखील खातरजमा जिल्हाधिकाऱ्यांनी करण्याची गरज आहे. तरच खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय दिला जाईल.

अकोला जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागांतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना मधील गॅम्बियन बंधाऱ्यांच्या कामांमधील कथित अनियमिततेबाबत विचारणा विधीमंडळात उपस्थित करण्यात आली आहे. डिसेंबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात अकोला जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात



आलेल्या 'पाणलोट विकास घटक २.०' अंतर्गत कामांच्या वाटपात पारदर्शकतेचा अभाव आणि आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहे. लाखो रुपयांच्या कामांचे चुकीच्या पद्धतीने वाटप झाल्याचा मुद्दा चर्चेत आहे. इतकेच नाही तर ४३ कामांच्या निविदा प्रक्रियेत गंभीर त्रुटी अधोरेखित झाल्या आहे. नियमानुसार मोठ्या कामांच्या निविदा 'महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल'वर आणि विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक असते. मात्र, या प्रकरणात तसे न करता, कमी खपाच्या आणि जिल्ह्यात फारशा परिचित नसलेल्या स्थानिक दैनिक व साप्ताहिकांमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ दरम्यान या जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप आहे. त्याची चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. कारण विशिष्ट कंत्राटदारांची रिंग करत कामे वाटप झाल्याची ओरड सुरु झाली आहे. जिल्हा जलसंधारण अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांनी संगनमत करुन एकाच कंत्राटदाराला किंवा त्याच्याशी संबंधित संस्थांना ३ ते ४ कामांचे कार्यारंभ आदेश दिल्याची ओरड सुरु झाली असून हे कंत्राटदार कोण अशी विचारणा झाली आहे.

# विद्यार्थिनीला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देत ब्लॅकमेल !

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**शेगाव :** बुलढाणामधील शेगाव परिसरात एका नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या २१ वर्षीय तरुणीला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देत ब्लॅकमेल करणाऱ्या युवकाला नागरिकांनी चोप दिला. सदर प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून न्यायालयाने तीन दिवसांची कोठडी सुनावली आहे. माझ्याशी संबंध ठेव, संभाषण सुरू ठेव, अन्यथा तुझे माझ्याकडे असलेले अश्लील फोटो व्हायरल करेल, अशी धमकी देत मोहम्मद शाकीर (२७) या युवकाला सामाजिक कार्यकर्त्यांनी चांगलाच चोप दिला.

याप्रकरणी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी दिलेल्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर मोहम्मद शाकीरला शुक्रवारी न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## इतर मागास विकास विभागाच्या पुरस्कारांसाठी मुदतवाढ

**अमरावती :** इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या पुरस्कारांसाठी पात्र व इच्छुक व्यक्ती, तसेच संबंधित समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे. यासाठी दि. ३ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संचालनालयातर्फे महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार देण्यात येतात. यासाठी अर्जदार व्यक्ती, संस्था राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिकक आदी क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केलेले असावे. अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून अनुषंगिक सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्यांचा सविस्तर अहवाल, शिफारस पत्रे व प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

# मनपा उद्यान विभागाच्या गलथानपणा विरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आक्रोश


### ◆ उद्यान विभागाच्या कामकाजाची चौकशी करण्याबाबत मनपा आयुक्तांना निवेदन

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अमरावती :** मनपाच्या उद्यान विभागात सध्यस्थितीत गलथान, भोंगळ व बेजबाबदार कारभार चव्हाट्यावर आला असल्याने स्वच्छ, सुंदर व हरित अमरावतीच्या संकल्पनेला खीळ बसत आहे. याविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेस ने आक्रोश व्यक्त करीत मनपा कार्यलयावर धडक दिली.

मनपाच्या उद्यान विभागाच्या वतीने शहरातील उद्यान विकसित करण्यास संदर्भात कुठलीही कार्यवाही होत नसून उद्यानाच्या देखभाल व दुरुस्तीकडे सुद्धा दुर्लक्ष केले जात आहे. शहारातील दुभाजकांमधील हिरवळ सुद्धा सुकलेली असून याकडे सुद्धा दुर्लक्ष होतांना दिसत आहे

सध्या अमरावती महानगरपालिकेच्या उद्यान विभागात चार नवीन शक्तिमान वाहन दाखल झाले आहेत. मात्र शहरात वृक्ष छटाई



करण्याची कार्यवाही नियमित होत नसून ज्या वृक्षांची छटाई करण्यात आली, त्या त्यांच्या गंजी सुद्धा महिनाभर उचलल्या जात नसल्याने वाहतुकीला देखील अडथळा निर्माण होत आहे. मनपाच्या उद्यानातील खेळणी सुद्धा नादुरुस्त असून त्याठिकाणी दुरावस्था निर्माण झाली आहे. उद्यानाच्या दुरावस्थेमुळे जेष्ठ नागरिक व महिलांना देखील त्याठिकाणी जाणे गैरसोयीचे ठरत आहे. याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष - ऋतुराज राऊत यांनी मनपा आयुक्तांना अवगत केले. तसेच यासंदर्भात संबंधित उद्यान विभागातील अधिकाऱ्यांना विचारणा केली असता ते मनुष्यबळ नसल्याचे कारण पुढे करून वेळ मारून नेतात.तसेच कामांवर तरतूद मिळाली नसल्याचे कारण सांगून उडवाउडवीची उत्तरे देतात. या सर्व बाबी लक्षात घेता, मनपा उद्याना विभागातील संबंधितांचे नियंत्रण नसल्याने गलथान, भोंगळ व बेजबाबदार कामकाज कारणीभूत असल्यामुळे मनपाच्या स्वच्छ - सुंदर व हरित अमरावतीच्या संकल्पनेला खीळ बसत आहे. म्हणून संबधित प्रकरणात उद्यान विभागाच्या कामकाजाची चौकशी करून या संदर्भातील सर्व माहिती जनतेसमोर आणण्यात यावी व मनपा उद्यान विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी, या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने मनपा आयुक्तांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष -ऋतुराज राऊत यांच्यासह सुनील जावरे, संकेत बोके, मनीष पाटील, अतुल इंगळे, पियुष मोरे, प्रथमेश बोके, कर्नलसिंह राहाल, सागर इंगळे, अजय बेहरे, जयेश सोनोने, सार्थक खोरगडे, प्रमोद धनाडे, प्रथमेश गवई, उज्वल पांडे, बबलू वाडेकर, अभिजित लोयटे, मनीष फाटे, श्रवण भोरे, धिरज तायडे, पंकज शर्मा, अक्षय पळसकर, पंकज खंडाळकर अमन गुडधे, तेजस पोटे, आदेश भोकरे, ऋतुराज साबळे, वैभव वऱ्हाडे, तौसिफ़ हुसेन, प्रणव हिवसे, सारंग देशमुख, शिवकुमार कैथवास, दीपक खंडारे, सर्वेश खेडकर, शुभम पांडे, शास्वत मालपे, अमोल गुल्हाने, राहुल इंगोले, सोमेश्वर रोहणकर आदींसह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व सर्व सहकारी उपस्थित होते. या प्रकरणात मनपा उद्यान विभागाच्या गलथान कामकाजाची चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही न केल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

**उद्यान अधीक्षक विंचुरकर यांच्या कक्षात टाकल्या वृक्षांच्या फांद्या**

महापालिकेत चार नवीन शक्तिमान वाहन सुद्धा दाखल झाले आहेत, मात्र याबाबत कामकाज होतांना दिसत नाही वृक्षछाटणी करण्यात आल्या नंतर महिनाभर सुद्धा गंज्या उचलल्या जात नाही. याबाबत काय उपाययोजना करण्यात आल्यात, मागील वर्षभरात शहरात उद्यान विकसित करण्यासंदर्भात कुठल्या तरतुदी करण्यात आल्यात, तसेच सार्वजनिक उद्यानतील विविध कामांवर कुठल्या तरतुदी करण्यात आल्यात, तसेच नवीन शक्तिमान वाहन आतापर्यंत कोणकोणत्या भागात पाठविण्यात आल्यात, याबाबत विचारणा करीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी उद्यान अधीक्षक अजय विंचूरकर यांच्या कक्षात वृक्षाच्या फांद्या आणून टाकल्या. मनपा उद्यान विभागाच्या गलथान व भोंगळ कारभारा विरुद्ध राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्यकर्ते यावेळी संतप्त झाले होते. दरम्यान कार्यकर्त्यांनी महापौर श्रीचंद तेजवानी यांची भेट घेऊन उद्यान विभागातील अनागोंदी कारभाराबाबत अवगत केले.

## होळीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ सजली; २ व ३ तारखेला रंगोत्सवाची धामधूम

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अमरावती :** शहरात होळीचा सण २ आणि ३ तारखेला साजरा होणार असून त्याआधीच बाजारपेठ रंगांनी बहरली आहे. मुख्य बाजार, चौक आणि गल्लीबोळांमध्ये रंग, पिचकारी, फुगे, गुलाल आणि विविध आकर्षक वस्तूंनी दुकाने सजली आहेत. लहान मुलांसाठी कार्टून आकाराच्या पिचकाऱ्या, तर तरुणांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे रंग उपलब्ध झाल्याने खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे.

गुलाबी, हिरवे, पिवळे, निळे अशा रंगांच्या उधळणीने बाजारपेठ आकर्षक दिसत आहे. काही दुकानदारांनी नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक रंगांची विक्री सुरू



केली असून त्याला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. महिलांसाठी पारंपरिक साड्या, दागिने तसेच सणासाठी लागणाऱ्या पूजेच्या साहित्याचीही मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे.

२ तारखेला होळी पूजन आणि ३ तारखेला धुळवड साजरी होणार असल्याने नागरिक खरेदीत व्यस्त आहेत. गोडधोड पदार्थांसाठीही मिठाईच्या दुकानांमध्ये विशेष तयारी करण्यात आली आहे. पुरणपोळी, करंजी आणि इतर पारंपरिक पदार्थांची ऑर्डर देण्यात येत आहे.

एकूणच, येत्या २ व ३ तारखेला होणाऱ्या होळीच्या स्वागतासाठी शहर सज्ज झाले असून बाजारपेठेत सणाची रंगत स्पष्टपणे दिसून येत आहे. रंगांच्या या उत्सवाची आतुरता आता सर्वांना लागली आहे.

## भरधाव कार-दुचाकीची भीषण धडक; लग्न खरेदीसाठी निघालेल्या महिलेचा जागीच मृत्यू, पाच जण जखमी

**अमरावती :** लग्नासाठी कपडे खरेदी करण्यासाठी अमरावतीच्या मार्केटमध्ये निघालेल्या यवतमाळ येथील कुटुंबाच्या कारचा दुचाकीशी भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील एका महिलेचा घटनास्थळी मृत्यू झाला असून दुचाकीस्वारासह पाच जण जखमी झाले आहेत. ही दुर्घटना तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाभुळगाव ते देवगाव मार्गावर सरुळ गावाजवळ घडली. भावना प्रवीण कदम (४०, कारंजा, वाशिम) असे मृत महिलेचे नाव आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातात पार्थ देशमुख (१८), योगेश देशमुख (५५), सारिका देशमुख (४८), सीमा वानखडे (३५) तसेच दुचाकीचालक नीलेश बाहे (३०, रा. जळगाव



आर्वी, ह.मु. तिवरा) हे जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीलेश बाहे हे गवंडी काम करतात. गुरुवारी सकाळी ते देवगावकडून दुचाकीने राणी अमरावतीच्या दिशेने जात होते. त्याचवेळी देशमुख कुटुंब यवतमाळकडून कारने अमरावतीकडे येत होते. दरम्यान, दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## २८ फेब्रुवारीला परमहंस परशराम महाराज पुण्यतिथी सोहळा

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

### ◆ दोन मार्च ला गावात होळी न साजरी करण्याची परंपरा कायम

**दर्यापूर :** पिंपळोद गावातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था पिंपळोद परशराम महाराज मंदिर परशराम नगर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही परमहंस परशराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम मोठ्या श्रद्धाभावाने आयोजित करण्यात आला आहे. परमहंस परशराम महाराज यांनी आपल्या आयुष्यात अध्यात्म, साधना आणि आपल्या अवलिया लिला माध्यमातून गावकऱ्यांना प्रचिती दिली. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही ग्रामस्थांच्या जीवनशैलीत दिसून येतो. त्यांच्या शिकवणुकीनुसार गावात साधेपणा, बंधुभाव आणि एकोप्याचा संदेश पाळला जातो.विशेष म्हणजे, महाराजांच्या स्मरणार्थ गावात होळी सण साजरा न करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून जपली जात आहे. महाराजांनी होळीच्या दिवशी सण १९५१ रोजी देहावसन झाले त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ





होळी साजरी केली जात नाही आणि रंगपंचमी सुद्धा खेळली जात नाही. या निर्णयामुळे गावात सामाजिक ऐक्य व शांततेचा संदेश दिला जातो.

पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. हा सोहळा मोठ्या भक्ती भावाने संपन्न होत असतो. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ यांनी विशेष परिश्रम घेतात सदर कार्यक्रमाची सूची प्रमाणे संस्थेच्या प्राणांगणात हा कार्यक्रम साजरा होत आहे शनिवार दि. २८/२/२६ रोजी - मूर्तिपूजा व होमहवन रविवार दि. १/३/२६ रोजी - मंदिराचे नूतनीकरण केल्याबद्दल मूर्ती स्थापना व पूर्णाहुती सोमवार दि. २/३/२६ रोजी - तीर्थस्थापना बुधवार दि. ४/३/२६ रोजी श्रींची मिरवणूक सोबतच दुपारी ठीक दोन वाजता ह भ प श्री दासगिरी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त परिसर स्वच्छता

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अमरावती:** वैराग्यमुर्ती संत गाडगे महाराज यांच्या जयंती सप्ताहाच्या महापर्वानिमित्त भ्एझ् चे मार्गदर्शक सुनील राणा यांनी नगरसेविका सुमती ढोके यांच्यासह गोपाल नगर परिसरात प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियान राबवले. या उपक्रमातून त्यांनी संत गाडगे महाराजांच्या विचारांचा वारसा जपत समाजाला स्वच्छतेचा ठोस संदेश दिला. या वेळी रस्ते, नाल्या, सार्वजनिक ठिकाणे व परिसरातील कचरा स्वच्छ करून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्यात आले. ङ्कस्वच्छता ही सेवा आहेङ्क हा संत गाडगे महाराजांचा संदेश अंगीकारत, केवळ भाषणापुरते न



राहता कृतीतून बदल घडवण्याचा निर्धार या उपक्रमातून दिसून आला. सुनील राणा यांनी सांगितले की, ङ्कसंत गाडगे महाराजांनी आयुष्यभर स्वच्छता, साधेपणा आणि समाजसेवा यांचा आग्रह धरला. त्यांच्या विचारांनुसार स्वच्छ परिसर म्हणजे निरोगी समाज. प्रत्येक नागरिकाने आपल्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता राखणे ही आपली जबाबदारी आहे.ङ्क नगरसेविका सुमती ढोके यांनीही नागरिकांना आवाहन करत, ङ्कस्वच्छतेतूनच आरोग्य, शिस्त आणि सकारात्मकता निर्माण होते. आपण सर्वांनी एकत्र येऊन आपल्या परिसराला स्वच्छ ठेवले तरच संत गाडगे महाराजांच्या विचारांना खरी मानवंदना ठरेल,ङ्क असे म्हटले. या स्वच्छता अभियानात स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. जयंती सप्ताहानिमित्त राबवलेल्या या उपक्रमामुळे गोपाल नगर परिसर स्वच्छ तर झालाच, शिवाय समाजात स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होऊन नागरिकांना प्रेरणाही मिळाली. यावेळी नगरसेविका सुमती ढोके, प्रशांत कावरे, सुनिल बोने, विशाल इंगोले, मुकुंद पंचांरिया, प्रियंका पंचांरिया, सागर तोंडे, वर्षा पाटणे, सारिका अवघड, स्वास्थ निरीक्षकं राजुरकर, वैभव खराड, प्रियंका, बैस, गुल्हाने मॅडम जीवन बनारसे, इंद्रजित नागदिवे, आकाश शिरभाते, मानके भाऊ, अनिकेत आदि उपस्थित होते.

## नागपूरी गेट हद्दीत जुगार पकडला

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अमरावती :** २७/०२/२०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक पोलिस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना बातमीदाराकडून माहिती मिळाली की पो स्टे नागपुरी गेट हद्दीतील गुलिस्ता नगर येथे सार्वजनिक ठिकाणी ङसोनू पठाणङ हा त्याचे घराजवळ ५२ तास पत्त्याचा जुगार खेळ खेळवीत आहे. पो.स्टाफ व पंचासह नमूद ठिकाणी गुन्हे शाखेचे पथक गेले असता येथे जुगार पकडण्यात आला.

आरोपी मध्ये शेख जुनेद शेख नासिर वय ३३ वर्ष यास्मिन नगर अमरावती, मोहम्मद रजिक मोहम्मद कासम वय४४ वर्ष राहणार गुलिस्ता नगर अमरावती, रिझवान खान रहीम खान वय २९ वर्ष लालखडी, मोहसीन खान हबीब खान वय २३ वर्ष यास्मिन नगर अमरावती, शेख सोहेल परवेज अब्दुल हाफिज वय २६ वर्ष राहणार रहमत अमरावती, काझी फयाजुद्दीन उर्फ बाबा एजाजुद्दीन वय २८ वर्ष यास्मिन नगर अमरावती



आजम खान अजीज खान वय ३५ वर्ष राहणार रहमत नगर अमरावती, सोनू खान अहमद खान वय ३४ वर्ष गुलिस्ता नगर अमरावती यांचा समावेश आहे.

असे आठही आरोपी ५२ तास पत्तेचा जुगार खेळताना मिळून आले त्यांचे जवळून त्यांच्याकडून ९९४०/- रु रोख रक्कम, ३५०००/- रु पाच मोबाईल १००/- रु ताश पत्ते असा एकूण ४५०४५/- रुपये चा जुगार मुद्देमाल पंचासमोर जप्त करून पो स्टे नागपुरी गेट येथे कलम १२(अ )म. जु. का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पेसा १७ संवर्ग नियुक्तीचा प्रश्न पेटला

### ◆ अमरावतीत २७ फेब्रुवारीपासून आंदोलन सुरु

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अमरावती :** आदिवासी १७ संवर्ग पेसा कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य (अमरावती जिल्हा) यांनी पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील नियुक्तीस पात्र उमेदवारांना तात्काळ कायमस्वरूपी नियुक्ती देण्याची मागणी करत २७ फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे सादर करण्यात आले आहे.

संघटनेने दिलेल्या



माहितीनुसार, सन २०२३ मधील पेसा १७ संवर्ग पदभरती संदर्भात प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सामान्य प्रशासन विभागाने ५ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय काढून मानधन तत्वावर पदभरती केली होती. त्यानंतर ११ फेब्रुवारी २०२६ रोजी शासनाने पेसा क्षेत्रातील १७ संवर्गाच्या पदभरतीबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या. मात्र, या सूचनांना सात ते आठ दिवस उलटूनही अद्याप कोणत्याही संवर्गातील पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आलेले नाही, असा आरोप संघटनेने केला आहे.

२६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत नियुक्तीपत्र न मिळाल्यास २७ फेब्रुवारीपासून बेमुदत आंदोलन सुरू करण्यात येईल, अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली आहे. संघटनेचे प्रतिनिधी श्री. कैलास दामू बबी यांनी प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून तात्काळ उपाययोजना करावी व पात्र उमेदवारांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या आंदोलनामुळे प्रशासनासमोर नवीन आव्हान उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## संत योगीराज गोविंद महाराज यांचा किर्तन महोत्सव

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

### ◆ भाजपा नेत्या नवनीत राणा यांची उपस्थिती

**अमरावती :** बडनेरा रोडवरील अमरावती येथे समर्थवाडी मधिल संत योगीराज गोविंद महाराज यांच्या किर्तन महोत्सवाचा समारोप सोहळा उत्साहात पार पडला. या समारोप कार्यक्रमाला भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत रवि राणा यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांनी प.पू. भाऊसाहेब यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला व उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

संत परंपरेचा वारसा जपणाऱ्या या किर्तन महोत्सवात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. कीर्तनातून समाजात अध्यात्म, नैतिकता आणि संस्कारांची जोपासना होत असल्याचे मत



सौ.नवनित राणा यांनी व्यक्त केले. समाज एकत्र आणण्याचे व अध्यात्मातून सकारात्मक ऊर्जा देण्याचे कार्य संतांच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रविण तायडे, पोलीस आयुक्त राकेश ओला, उपमहापौर सचिन भेंडे, युवा स्वाभिमान पार्टीचे गटनेते नाना आमले, तसेच बडनेरा पोलीस निरीक्षक सुनिल चव्हाण यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात कीर्तन, भजन आणि प्रवचनांच्या माध्यमातून संतांच्या विचारांचा जागर करण्यात आला. शेवटी आरती आणि प्रसाद वितरणाने महोत्सवाची सांगता करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी संत परंपरेच्या जतनासाठी व समाजहिताच्या कार्यासाठी सदैव सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

समारोप सोहळ्यामुळे समर्थवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करण्यात आले. यावेळी सारीका अवघड, पाटील ताई, मोनी दादा, दिलीप भाकरे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# प्रणिती माने व श्रीनाथ जाधव एनएमएमएस स्कॉलरशिप परीक्षा उत्तीर्ण

**अकोट:** पळसोद येथील प्रणिती रामकृष्ण माने व श्रीनाथ निलेश जाधव यांनी एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवले.

श्रीनाथ जाधव हा कृषी महाविद्यालय अकोट शाळेचा तर प्रणिती रामकृष्ण माने स्वामी विवेकानंद विद्यालय पळसोद येथील विद्यार्थिनी




आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नववी ते बारावीपर्यंत प्रतिवर्षी बारा हजार रुपये शासनाकडून स्कॉलरशिप दिली जाते.

केंद्र सरकार द्वारा आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारी करता या विद्यार्थ्यांना प्रा. सतीश वाडेकर व खोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाचे दरवाजे उघडणार

**अकोला:** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहे.

आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

## मासिक पेन्शन अदालत पूर्ववत सुरू करा

### जि. प. सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची मागणी

**अकोला:** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने पेन्शन अदालत सुरू करावी अशी मागणी जि. प. सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेतर्फे करण्यात आली. जिप कर्मचारी कल्याण भवनात झालेल्या संघटनेच्या सभेत या मागणीचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. सभेत इतरही समस्यांवर व विषयांवर चर्चा करण्यात येऊन त्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करण्यावर भर देण्यात आला.

सभेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब लांडे होते. याप्रसंगी उपाध्यक्ष प्रदीप खाडे, उपाध्यक्ष प्रेम कुमार खत्री, कोषाध्यक्ष अशोक मांगुळकर, सहसचिव प्रदीप बेलोकार, संघटक जे. के. खान, अरुण साकरकर, युसुफ इक्बाल, बाळकृष्ण रोकडे, भरत आपोतिकर, रजनी रगडे, नभु श्रीवास आधी पदाधिकारी व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व संघटनेतील निधन पावलेल्या सभासदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# पातूर येथे शिवसेना उबाठाकडून गटविकास अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**पातुर:** शिरला ग्रामपंचायतच्या सचिवाच्या अनागोंदी कारभाराला कंटाळून युवा सेना जिल्हाप्रमुख सागर रामेकर यांच्या नेतृत्वात नागरिकांनी पातुर पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या दालनात २७ फेब्रुवारी रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनामध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता शिरला ग्रामपंचायत ची सचिव यांचा मनमानी कारभार, प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार, नागरिकांशी असभ्य वर्तणूक, मोठ्या प्रमाणात खोळंबली कामे या विरोधात आज शिवसेनेच्या वतीने ठिय्या



आंदोलन करण्यात आले आंदोलनाची उग्रता पाहता गटविकास अधिकारी यांनी नागरिकांच्या सर्व तक्रारी ऐकून घेऊन संबंधित सचिवावर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर नागरिकांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. व आठ दिवसात योग्य कारवाई न केल्यास अकोला मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात मोठे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला आहे या आंदोलना दरम्यान मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त उपस्थित होता यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख सागर रामेकर, विशाल तेजवाल, शिवसेना उपतालुका प्रमुख रामेश्वर बेलूरकर, शाखा प्रमुख विठोबा ढाळे , सचिन गिऱ्हे, प्रविण पोहरे, गणेश राहुलकर, रामू ढगे, सुनिल हजारे, श्याम ठाकरे, राहुल गवई, प्रशिक शिरसाठ, बबिता तायडे, छाया पोहरे, द्रौपडाबाई वानखडे, अजिंक्य बोरकर, मधुकर पोहरे, संगीता गिऱ्हे, रंजना सोनोने, प्रमिला वानखडे सह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# माजी खासदार संजय धोत्रे यांच्या वाढदिवसा निमित्त बाळापूर येथे रुग्णांना फळ वाटप



प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**बाळापूर:** माजी केंद्रीय मंत्री खासदार संजय धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त येथील ग्रामीण रुग्णालय येथे भारतीय जनता पार्टी शहरच्या वतीने रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. डिगांबर बुलबुले यांच्यासह भाजपचे जेष्ठ नेते किशोरचंद्र गुजराथी, बाबुजी शर्मा, तालुकाध्यक्ष किशोर कुचके, शहर अध्यक्ष नितीन लांडे, नगरसेवक अब्दुल गुफरान उर्फ सज्जाद, प्रितेश गुजराथी, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस बंटी महाराज कानकुब्ज, महेंद्रसिंह ठाकुर, प्रशांत गायकवाड, शहर सरचिटणीस चैतन्य अंबाडे, मनोज बनचरे, कैलाश सरोवरे, प्रमोद मात्रे, गजानन सुरजुसे, अजय पदमने, योगेश ठाकुर, शाम वहिले यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे बाळापूर शहर पदाधिकारी उपस्थित होते.

# अकोलखेडची नेहा महाजन एमकेसीएल ऑलिंपियाडमध्ये जिल्ह्यातून दुसरी

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोट:** श्री नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अकोलखेड येथील इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी कुमारी नेहा कोमलचंद महाजन हिने एमकेसीएल ऑलिंपियाड मूव्हमेंटमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. तिने तुलसी कम्प्युटर्स सेंटर अकोलखेड मधून सहभाग नोंदवत अकोला जिल्ह्यामधून द्वितीय रँक प्राप्त केला. तिच्या या यशाबद्दल विद्यालयात विशेष



सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या हस्ते, सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत तिला ऑलिंपियाड मूव्हमेंट किट व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. नेहरू विद्यालयाचे पर्यवेक्षक इंगळे, एमकेसीएलचे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह प्रसाद तायडे यांनी मार्गदर्शन केले.

# मराठी सारस्वत म्हणून होणारा सन्मान संस्मरणीय क्षण : डॉ.प्रतिमा इंगोले

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला:** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रख्यात साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर उपाख्या कुसुमाग्रज यांच्या जयंती दिनानिमित्त साजऱ्या होत असलेल्या 'मराठी भाषा दिना'ला श्री समर्थ शिक्षण संस्थेने 'मराठी सारस्वत' म्हणून केलेला सन्मान संस्मरणीय क्षण असल्याचे गौरवोद्गार ख्यातनाम लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांनी काढले.

त्या श्री समर्थ पब्लिक स्कूलच्या वतीने आयोजित 'मराठी भाषा गौरव



दिन' कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलत होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, संस्थेच्या संचालिका प्रा. जयश्री बाठे यांच्या वतीने शाळेच्या प्राचार्या उषालता वानखेडे यांनी स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रतिमा इंगोले यांचा सन्मान केला. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार उपस्थित होते. यावेळी इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कु. रेवा जोगळेकर हिने डॉ. प्रतिमा इंगोले यांच्यासारखी वेशभूषा व केशभूषा करून त्यांची 'पुन्हा एकदा' ही कविता सादर केली. त्यानंतर विद्यार्थ्यांची, शिक्षकांची, पाहुण्यांची यथोचित भाषणे झाली. प्रत्येक भाषणांमधून मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे आणि मराठी भाषेतच बोललं पाहिजे, असा उल्लेख सुद्धा करण्यात आला. याप्रसंगी पूर्व प्राथमिक तथा प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी सुरेख नृत्य सादर करून मराठी भाषेचा हा मराठी सण उत्साहात साजरा केला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# ऐतिहासिक नरनाळा महोत्सवामुळे पर्यटनाला चालना मिळाली

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

## ◆ दखल टीमने घेतली जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची कृतज्ञता भेट

**अकोला:** जिल्ह्यात नरनाळा महोत्सवाचे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिमाखदार आयोजन १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान जिल्हा प्रशासन व वनविभागाच्या माध्यमातून झालेल्या आयोजना बाबत येथील दखल या संस्थेच्या टीमने जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची कृतज्ञता भेट घेतली. पर्यटनाला चालना दिल्याबद्दल व अभूतपूर्व आयोजनाबद्दल आभार मानले.



या वेळी दखलचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप गुरुखुद्दे , कार्यकारी सदस्य ठाकूरदास चौधरी, शशीकांत हांडे, महेश देशमुख, विपीन सुरतकर, डॉ. चंद्रकांत पनपालीया, जयप्रकाश पाटील, दिलीप हांडे, संदीप काळे आदि दखलचे सदस्य उपस्थित होते. नरनाळा महोत्सवामुळे पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या संकल्पनेतून इन्व्हेस्टर मीटचे आयोजन केले होते. या मीटमध्ये कान्हा-किसली, नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, पुणे, मुंबई, इंदोर ,भोपाल आदी ठिकाणहून अनेक पर्यटन क्षेत्रात काम करणारे उद्योजकांनी भेट दिली. या वेळी पोपटखेड धरणात बोटींग सुविधा सुध्दा सुरु करण्यात अलेली आहे. नरनाळा ऐतिहासिक किल्ल्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधण्यासाठी महोत्सव आयोजनाची संकल्पना पुढे आली. अकोला येथील कलावंत प्रदीप गुरुखुद्दे यांनी ही मागणी लावून धरली होती, त्याची परिणती आहे. २०२५ मध्ये जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना दखल तर्फे प्रदीप गुरुखुद्दे यांनी निवेदन दिले. २०२६ पासून परत हा नरनाळा महोत्सव सुरु करण्यात आला. या महोत्सवाची परत सुरुवात करण्याचे संपूर्ण श्रेय जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना जाते. त्यांनी ऐतिहासिक वारसा व समृद्ध वन्यजीवन लाभलेला हा किल्ला महोत्सवाच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी पर्यटकांना उपलब्ध करुन दिली आहे. नरनाळा महोत्सवात पर्यटकांसाठी वनपर्यटन, निसर्ग अभ्यास, वनस्पती अभ्यास, पक्षी, प्राणी यांची ओळख, साहसी क्रीडा प्रकार, नौकाविहार अशी अनेक आकर्षणे अनुभवायला मिळाली आहेत. वनपर्यटनाबरोरच साहसी क्रीडा प्रकार आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शोध व बचाव कार्य प्रशिक्षण आदी महत्वाच्या बाबी निसर्गप्रेमी व विद्यार्थ्यांसाठी मोलाच्या ठरल्या आहेत. यातून स्थानिक आदिवासी बांधवांना रोजगारही मिळत आहे. महोत्सवाच्या आयोजनाबद्दल जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे जिल्हा प्रशासनाचे, वन्यजीव विभागाचे उपवनरक्षक राहुलसिंग तोलीया, अकोटचे विभागीय अधिकारी मनोज लोणारकर, तहसीलदार चव्हाण, सहायक वनविभागाचे सहायक उपवनसंरक्षक गणेश टेकाडे आदिंचे दखलने आभार मानले.

# भागवताचा विचार, भव रोगावर उपचार : वेदांत महाराज

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोट:**
***ब्रह्म मूर्ती संत जगी अवतरले ।***
***उद्धराया आले दिन जना ।।***

श्रीमद् भागवत अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रथम पुष्प गुंफत असताना देवाला आवडेल असं जीवन जगणे, म्हणजेच खरी भक्ती आहे. भाव विसरून समाधानी वृत्ती ठेवून प्रत्येकात परमात्म्याचे दर्शन करणे, खरी साधना आहे असे हभप वेदांत महाराज म्हणाले.

द्वितीय पुष्प गुंफतांना सनातन संस्कृतीमध्ये अनेक ग्रंथ अनेक संत अनेक पंथ आणि अनेक भागवंत आहेत. ही आपल्या संस्कृतीची श्रीमंती आहे. पण ह्या सगळ्यांचा सन्मान करून आपली दृढ श्रद्धा एका ग्रंथावर एका संतापायी एका पंथांमध्ये एका भगवंतावर असणे आवश्यक आहे. तृतिय पुष्प



गुंफताना भागवताचा विचार भवरोगावर उपचार असे भागवत कथा प्रवक्ते हभप श्री वेदांत महाराज श्रीपर्ण यावेळी सर्व भाविक भक्तांना संबोधित केले.

ब्रह्मलीन परमहंस श्री संत चतुर्भुज महाराजांच्या पुण्यस्मरणार्थ श्रीमद् भागवत नाम सप्ताह व श्रीमद भागवत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ५० व्या सुवर्ण पुण्यतिथी महोत्सवानिमित्ताने भव्य यावर्षी सुद्धा आयोजन करण्यात आले आहे यावेळी सप्ताहामध्ये नामवंत कीर्तनकार बुधवार हभप प्रवीण महाराज कुलट, गुरुवार हभप पंढरीनाथ महाराज इंगोलेकर, शुक्रवार हभप सुभाष महाराज बोबडे, भाविकांनी कीर्तनकार महाराजांचा सोहळ्यामध्ये अवश्य लाभ घ्यावा व सप्ताहामध्ये काकडा श्रीमद् भागवत कथा वाचन सायंकाळी दररोज हरिपाठ मध्ये वेगळाच विभूतीचा आनंद व्यक्त करायला मिळत आहेत व सर्व येणाऱ्या कीर्तनकार महाराजांचा भागवत समितीकडून शाल श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान होत आहे दररोज सर्व हरिनाम सप्ताह मधील कथा श्रोत्यांना व भाविकांना प्रसाद व्यवस्था केली आहे.

# तेल्हारा आगाराची बस थांबलीच नाही, वाशिम बायपासवर महिलांसह १४ प्रवासी खोळंबले

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**तेल्हारा:** अकोला–तेल्हारा मार्गावरील शेवटची एसटी बस २५ रोजी रात्री सुमारे ८ वाजता वाशिम बायपास, अकोला येथे थांबली नाही, असा गंभीर आरोप प्रवाशांनी केला आहे. पुसद येथून आलेले दहा महिला व चार पुरुष असे एकूण १४ प्रवासी तेल्हारा जाण्यासाठी बसची प्रतीक्षा करत उभे होते. बस आल्यानंतर सर्वांनी हात दाखवून आणि बसला थाप मारूनही चालक व वाहक यांनी बस न थांबवता पुढे नेल्याचे प्रवाशांनी तक्रार अर्जात नमूद केले आहे.

प्रवाशांच्या मते, ही अकोला येथून तेल्हारा जाणारी शेवटची बस असूनही थांबा असताना बस न थांबवल्यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. विशेष म्हणजे रात्रीची वेळ असल्याने महिलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



एकीकडे सरकार महिलांसाठी विविध योजना जाहीर करते, तर दुसरीकडे प्रत्यक्ष सेवेत मात्र महिलांकडे दुर्लक्ष होत असल्याचा अनुभव आला, अशी प्रतिक्रिया उपस्थित प्रवाशांनी दिली.

या संदर्भात तेल्हारा आगार प्रमुख मिथुन शर्मा यांना तक्रार निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात संबंधित चालक व वाहक यांच्या उर्मट वागणुकीबाबत कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून कारवाईची माहिती देण्याचीही मागणी प्रवाशांनी केली आहे. अन्यथा एसटी महामंडळाच्या ॲपवर ऑनलाईन तक्रार दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

तक्रार देताना मंगेश राऊत, मारुती कडू यांच्यासह वैजयंती ठाकरे, रूपाली उपाध्ये, वंदना केने, सुवर्णा हिवसे, नंदा अरबट, पुष्पा महल्ले, बबीता भोजने, अरुणा भोजने, शोभाताई, अनिता भटकर आणि लता गावंडे या महिला उपस्थित होत्या.

दरम्यान, आगार व्यवस्थापक मिथुन शर्मा यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# १ मार्चपासून रमजानचा दुसरा अशरा सुरू

**अकोला:** पवित्र रमजान महिन्याची सुरुवात १९ फेब्रुवारीपासून झाली होती. २८ फेब्रुवारी रोजी दहा रोजे पूर्ण झाल्यानंतर रहमतचा पहिला अशरा संपन्न झाला असून १ मार्चपासून दुसरा अशरा — मगफिरत (पापांची माफी) — सुरू झाला आहे. रमजानचा पहिला अशरा हा अल्लाहच्या रहमतीचा काळ मानला जातो. या दहा दिवसांत रोजेदारांनी पूर्ण श्रद्धेने रोजे ठेवले, नमाज अदा केली, तरावीहमध्ये सहभाग घेतला आणि कुरआनचे पठण करून आध्यात्मिक लाभ मिळवला. मशिदींमध्ये विशेष उत्साह व गर्दी पाहायला मिळाली तसेच जकात, सदका आणि गरजूंच्या मदतीची भावना अधिक दृढ झाली. आता सुरू झालेला दुसरा अशरा हा मगफिरतीचा म्हणजेच पापक्षमतेचा काळ आहे. या दिवसांत अधिकाधिक इस्तिगफार करणे, आपल्या चुका मान्य करून मनापासून तौबा करणे आणि जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प करणे आवश्यक असल्याचे धार्मिक जाणकार सांगतात. तसेच परस्परांतील मतभेद दूर करून नातेसंबंध अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला आहे. रमजानचा हा टप्पा आत्मपरीक्षण, संयम आणि नैतिक मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देतो. समाजातील सर्वांनी उर्वरित दिवसांतही इबादत, सेवा आणि सद्भावनेची भावना जोपासावी, जेणेकरून हा पवित्र महिना प्रत्येकाच्या जीवनात शांती, बरकत आणि सकारात्मक परिवर्तन घडवून आणेल, असे कच्छी मेमन जमातीचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी म्हटले आहे.

# हिवरखेड पोलिसांची तळेगांव कत्तलखान्यावर धाड

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**हिवरखेड:** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या तळेगाव बाजार येथे अवैधरित्या गोमांस आढळून आले. पोलिसांना गोपनीय माहिती मिळताच धाड टाकली. आरोपी शेख नवाब शे नजीर तळेगांव याच्याजवळून १ लाखडी कुऱ्हाड, एक टोचा, व १३० किलो गोमास असा अंदाजे २६७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरुद्ध कलम ३२५ ५,५,(अ) ९,९,(अ) प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डे मेजर, आकाश गजभार, आश्विनी करवते यांनी केली. याबाबत तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत.

# मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७ येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला:** येथील पी. एम.श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्रमांक ७, रामदास पेठ येथे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. महापालिका प्रशासनाने आयोजन केले होते. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात तसेच शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर यांच्या नियोजनाखाली मनपा शिक्षण विभागाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन आयोजिण्यात आले.





कार्यक्रमाच्या उद्घाटक नगरसेविका निकिताताई देशमुख होत्या. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपअधीक्षक गजानन शेळके, जिल्हा काँग्रेस कमिटीचे महेश गणगणे, आसरा माता संस्थेच्या अध्यक्षा आशादेवी माताजी, मराठा महासंघाच्या रश्मीताई पटेकर व माधुरीताई वाघमारे, शाळा समिती उपाध्यक्ष राजेश गावंडे आणि डॉ. काशिनाथ पटेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समिती अध्यक्ष भीमराव डोंगरे होते. मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.२६ फेब्रुवारी रोजी प्रमिलाताई ओक सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी भारत मातेच्या आरतीने केली. देशभक्तीपर नृत्य, सामाजिक संदेश देणारे नाट्यप्रयोग, पारंपरिक लोकनृत्य, विज्ञानाधारित सादरीकरण तसेच इंग्रजी व मराठी भाषेतील प्रभावी सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमानंतर पालकांसाठी विशेष कार्यक्रम घेण्यात आले. पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर शिक्षिकांनीही सांस्कृतिक सादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

सन २०१७ मध्ये अवघ्या १५० विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही शाळा आज ६२० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. विविध स्पर्धा परीक्षा, क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, सांस्कृतिक स्पर्धा आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे पालकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. शिक्षकांचे टीमवर्क, नियोजनबद्ध अध्यापन आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांमुळे शाळेचा लौकिक वाढत असल्याची माहिती शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर यांनी दिली. हरीशचंद्र इटकर यांनी एका पालकासोबत मंचावर नृत्य करून सहभाग नोंदवला. गजानन शेळके यांनी सरकारी शाळा कॉन्व्हेंटच्या युगातही गुणवत्तेचा झेंडा रोवून उभी असल्याचे गौरवोद्गार काढले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात जनगणना : 5300 प्रगणकांची नियुक्ती

## मे २०२६पासून पहिला टप्पा

### जिल्ह्यात माझे गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान

■ जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत “माझे गाव, आरोग्य संपन्न गाव” अभियानाची माहिती दिली. हा उपक्रम SDG-3 अंतर्गत गावातील आरोग्य निर्देशांक सुधारण्यास केंद्रित असून, आरोग्य वधिर्ती केंद्रे व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या सक्षमीकरणासही चालना देईल. अभियानात जन आंदोलन आणि समुदायाची सक्रिय सहभागिता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. कार्यक्रमाचे वेळापत्रक 1 एप्रिल ते 30 एप्रिल: स्व-मुल्यमापन, 29 मे ते 15 जून: तालुका तपासणी, 16 जून ते 30 जून: जिल्हा तपासणी, 1 जुलै ते 15 जुलै: विभागस्तर तपासणी, 31 ऑगस्ट: राज्यस्तरीय पुरस्कार वितरण असे आहे. अभियानात ग्रामपंचायत आणि आरोग्य संस्थासाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे. ग्रामपंचायत : पहिले बक्षिस ₹20 लाख, दुसरे बक्षिस ₹30 लाख, तिसरे बक्षिस ₹10 लाख, आरोग्य संस्था : प्राथमिक आरोग्य केंद्र ₹50 लाख, ग्रामीण रुग्णालय ₹75 लाख, उपकेंद्र ₹25 लाख, अभियानाचे मुख्य ध्येय आहे – सशक्त समुदाय, सामूहिक वागणूक, दैनंदिन चर्चा आणि एकत्रित जबाबदारी. आरोग्य सुधारासाठी 5 स्तंभ निश्चित केले गेले आहे.

### मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना: विधानसभा क्षेत्र समितीस मान्यता

■ **यवतमाळ :** शेतकऱ्यांसाठी पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी यांसारख्या कामांसाठी तसेच शेतीमाल बाजारात पोहोचण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. यंत्रसामुग्रीच्या वाढत्या वापरामुळे चांगल्या दर्जाच्या रस्त्यांची आवश्यकता अधिक भासते. अनेक ठिकाणी शेतरस्ते अतिक्रमित किंवा खराब असल्याने शेतकऱ्यांना समस्या भेडसावत आहेत. या पार्श्वभूमीवर, शेत/पाणंद रस्त्यांना अधिक प्रभावी बनवण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना राबविण्यात येणार आहे. शासन निर्णय क्रमांक लवेसू 2025/प्र.क्र 02/पाणंदरस्ते/दिनांक 14.12.2025 नुसार ही योजना महसल विभागामार्फत मंजूर करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय कार्यकारी समिती स्थापन केली असून, अध्यक्ष म्हणून मा. पालकमंत्री आहेत. तसेच विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती स्थापन केली गेली असून, यामध्ये आमदार अध्यक्ष आणि उपविभागीय अधिकारी सदस्य सचिव म्हणून कार्य करतील. जिल्ह्यात एकूण 11 समित्या स्थापन करण्यात आल्या असून आतापर्यंत 8 ठिकाणी बैठका पार पडल्या आहेत. यंत्रसामुग्रीधारक व पाईपलाईन पुरवठादाराचे पॅनेल तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना यांच्यामार्फत सुरू असून, ही प्रक्रिया 28 फेब्रुवारी 2026 पर्यंत पूर्ण होणार आहे. जिल्हा प्रशासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित केला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी विकास विना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जनगणना २०२७ची प्रक्रिया सुरळीत व अचूक पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजनबद्ध हालचाली सुरू केल्या आहेत. ग्रामीण व शहरी भागात मिळून ५३००हून अधिक प्रगणक, तर सुमारे ८८४ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशिक्षणाची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी



विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यातील २१२६ ग्रामीण गावे आणि २५५ शहरी प्रभाग यांचे ७०० ते ८०० लोकसंख्येच्या निकषांनुसार गट तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार ग्रामीण भागात ४०६७, तर शहरी भागात १२३३ असे एकूण ५३०० गट निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र प्रगणक नेमण्यात आला असून देखरेखीसाठी ग्रामीण भागात ६७८ आणि शहरी भागात २०६ पर्यवेक्षक कार्यरत राहतील.

प्रशिक्षण प्रक्रियेची सुरुवात ‘मास्टर ट्रेनर’च्या प्रशिक्षणापासून होणार आहे. त्यानंतर जिल्हास्तरावर अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन दिले जाईल. अंतिम टप्प्यात चार्ज किंवा तालुका स्तरावर प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रत्यक्ष कामकाजाचे प्रशिक्षण दिले जाईल.

जनगणनेचा पहिला टप्पा ‘हाऊस लिस्टिंग अँड हाऊसिंग सेन्सस’ १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. दुसरा टप्पा म्हणून लोकसंख्या गणना फेब्रुवारी २०२७मध्ये होईल.

जिल्हा प्रशासनाने सर्व विभागांमध्ये समन्वय साधत नियोजनपूर्वक तयारी सुरू केली असून जनगणना प्रक्रिया पारदर्शक व अचूकपणे पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# यवतमाळ व वणीतील नेत्यांचा शिवसेनेत प्रवेश

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**यवतमाळ :** राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते ना. एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज यवतमाळ व वणी येथील विविध पक्षांतील नेते व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

कार्यक्रम नंदनवन निवासस्थान, मुंबई येथे पार पडला. यावेळी नव्याने प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या गेल्या. यावेळी दीपक कोकास, उपजिल्हा प्रमुख उ.बा.ठा आशिष खुलसंगे,



माजी जिल्हा परिषद सदस्य, वसंत जिनिंग, माजी अध्यक्ष राजू तुरणकर, माजी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष गजानन किन्हेकर, माजी तालुका अध्यक्ष अजिंक्य शेंडे, युवासेना उपजिल्हा प्रमुख पंकज मुंदे, माजी सभापती न.प. यवतमाळ शिवसेनेचे वरिष्ठ नेते आणि पक्ष कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला.

यावेळी पराग पिंगळे, समन्वयक पश्चिम विदर्भ हरिहर लिंगनवार आणि श्रीधर मोहोड, जिल्हा संपर्क प्रमुख राजुदास जाधव आणि गजानन डोमाळे, जिल्हा प्रमुख सुरेश चिंचोळकर, राज्य उपाध्यक्ष, शिवसेना आदिवासी आघाडी उपस्थित होते.

# कारेगावात मराठी राजभाषा गौरव दिन

## राजीव माध्यमिक विद्यालयात कुसुमाग्रजांना अभिवादन



प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**झरी :** कारेगाव येथील राजीव माध्यमिक विद्यालयात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी, नाटककार व साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कवितावाचन, गायन आणि मनोगतांच्या माध्यमातून मराठी भाषेप्रती आपला अभिमान व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुरेंद्र गेडाम होते. मराठी विषय शिक्षक रमेश पडलवार यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व पटवून देत, मराठीचा वापर केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता दैनंदिन व्यवहारात वाढवण्याचे आवाहन केले. नव्या पिढीला भाषेची गोडी लावणे हेच या दिनाचे खरे फलित ठरेल, असे ते म्हणाले. मुख्याध्यापक गेडाम यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्यसेवेचा आढावा घेत, मराठी भाषा, परंपरा आणि संस्कृतीचे जतन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांच्या गाजलेल्या ‘विशाखा’ या कवितासंग्रहातील निवडक कवितांचे वाचन व सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमास किशोर द्यावर्तीवार, श्रीनिवास कासावार, कपील कोरेवार, विश्वनाथ पुद्दरवार आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आकांक्षा कावडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन लावण्या शेंडे यांनी मानले.

# आ. राजू तोडसाम यांनी मांडला आरोग्य सुविधांचा मुद्दा



प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**आर्णी :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आर्णी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी पांढरकवडा, आर्णी व घाटंजी परिसरातील आरोग्य सुविधांचा मुद्दा ठामपणे सभागृहात मांडला.

पांढरकवडा - आर्णी - घाटंजी येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये आवश्यक वैद्यकीय साधनसामग्री, तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती, आधुनिक यंत्रसामग्री तसेच रुग्णांसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवरच गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळावी, यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका आमदार तोडसाम यांनी अधिवेशनात मांडली.

# पुसद तालुका सरपंच संघटनेच्या अध्यक्षपदी आशिष काळबांडे



प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**पुसद :** पुसद तालुक्यातील सरपंच संघटनेची विश्रामगृह पुसद येथे सभा पार पडली. सभेत संघटनेच्या अध्यक्षांच्या कार्यकाळाचे समीकरण व कारभार यावर उघड चर्चा झाली. मागील अध्यक्ष प्रवीण देशमुख यांनी संघटनेच्या कोणत्याही मागण्या पूर्ण करण्यास किंवा पुढाकार घेण्यास दुर्लक्ष केले होते.

सरपंच भवन, विहिरी, गोठा, घरकुल किंवा प्रशासकाच्या विषयांमध्येही ढेपाळ कारभार झाल्याचे उपस्थित सरपंचांनी निदर्शनास आणले.

या पार्श्वभूमीवर पुन्हा आशिष काळबांडे यांना अध्यक्षपदी निवडण्यात आले. यापूर्वी वैयक्तिक कारणामुळे त्यांनी राजीनामा दिला होता, परंतु पुन्हा एकमताने सर्व उपस्थित ६५ सरपंचांनी त्यांना अध्यक्षपदी मान्यता दिली. तसेच रणवीर पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सभेत अध्यक्ष आशिष काळबांडे यांनी सर्व सरपंचांना आश्वस्त केले की, उर्वरित कामे पंचायत समिती व मंत्री इंद्रनील भाऊ नाईक यांच्या सहकार्याने पूर्ण केली जातील. त्यांनी सांगितले की संघटनेतील जुनी अडचण दूर करून नवीन जोशाने काम केले जाईल.

पूर्वीही अनेक आंदोलनांच्या नेतृत्वाखाली आशिष काळबांडे यांनी संघटनेला मार्गदर्शन केले होते, त्यामुळे त्यांच्या अध्यक्षपदी पुनर्वसनाने सर्व सरपंचांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, कामे पूर्ण होण्याची अपेक्षा सर्वांमध्ये जागृत झाली आहे.

# म.ज्योतिबा फुले विद्यालयाचे १२१ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण

## कु. प्राप्ती गजानन शिंदे १३८ गुणांसह प्रथम

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**उमरखेड :** महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयातील वर्ग आठवीतील १२१ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक (NMMS) शिष्यवृत्ती परीक्षेत सत्र २०२५-२६ मध्ये उत्तीर्ण होऊन अभूतपूर्व कामगिरी केली आहे. साडेतीन लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत प्रवेश मिळतो.

विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोदराव देशमुख यांनी सांगितले की, “सातत्य, नियोजन, सराव व योग्य मार्गदर्शन तसेच नियमित परीक्षा व निकाल प्रेरणा या गोष्टी कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत.” मागील वर्षी ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते, तर या वर्षी योग्य नियोजनामुळे संख्या १२१ वर पोहोचली आहे.

विद्यालयातील शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी पर्यवेक्षक राणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शक पृथ्वीराज पतंगे यांनी जवळपास २० सराव परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना सज्ज केले.

विद्यार्थ्यांमध्ये कु. प्राप्ती गजानन शिंदे १३८ गुणांसह प्रथम, गोपाल जांबुवंत वानखेडे १३४ गुण आणि श्रुती दगडू जाधव १२७ गुण मिळवून उच्च क्रमांक प्राप्त केला. या यशामध्ये दर शनिवारी-रविवारी आयोजित सराव परीक्षा, तात्काळ निकाल आणि पालकांचा सहकार्य महत्वाचा ठरला. पात्र विद्यार्थ्यांना नववी ते बारावी दरमहा १००० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते, ज्यामुळे बारावीपर्यंत त्यांना जवळपास ४८ हजार रुपये मिळतात. संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, सचिव डॉ. या. मा. राऊत यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, कर्मचारी व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून, भविष्यासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सज्ज करण्यास सतत प्रयत्नशील आहे.

# ऑपरेशन प्रस्थान: क्रिकेटचा निधी ‘रुद्राश्र’ला भेट

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**आर्णी :** पोलीस स्टेशन आर्णीच्या वतीने ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत आयोजित APL क्रिकेट सामन्यांतून जमा झालेला निधी आज स्वर्गीय सुशिलाबाई नागपुरे रुद्राश्रम आर्णीस सुपूर्त करण्यात आला. सदर सामन्यांचा आयोजन पोलीस स्टेशन आर्णीच्या पुढाकाराने १६ ते २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पार पडला होता. सामन्यांचे उद्दिष्ट क्रिकेट खेळ आणि खेळाडूंच्या कलागुणांना वाव देणे, तसेच सामाजिक



बांधिलकीद्वारे स्वर्गीयांच्या स्मृतीस आदर दाखवणे होते. सामन्यांनंतर ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या हस्ते विजेता टीमला तसेच इतर बक्षीस वितरण करण्यात आले. उर्वरित निधी यावेळी स्वर्गीय सुशिलाबाई नागपुरे यांच्या स्मृतीसाठी रुद्राश्रम आर्णीस सुपूर्त करण्यात आला. या प्रसंगी पोलीस स्टेशन आर्णीचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. रुद्राश्रम आर्णी संचालक खुशाल नागपुरे यांनी निधी स्वीकारला.

# पारवा-कुरली येथे हिंदू संमेलन

## धर्मसंवादातून सामाजिक ऐक्याचा संदेश

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**पारवा :** पारवा-कुरली येथे विशाल हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. धार्मिक व सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या संमेलनाला कुरली गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उद्घाटन विदर्भ प्रांत समरसता गतिविधी प्रमुख आनंदी दास पाळेकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख वक्ते म्हणून योगेश महाराज पुरी यांनी मार्गदर्शन केले. विशेष अतिथी म्हणून संत शहापुरी महाराज उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणातून धर्मसंवर्धनासोबतच सामाजिक समरसतेची गरज अधोरेखित केली. युवकांनी संघटित होऊन समाजहिताच्या कार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक समितीचे अध्यक्ष यमसनवार, नरहरी पुलकम्बर, गोविंदा चौधरी, भगवान रुद्राक्षवार, संतोष अक्केवार, सुशांत रेड्डीवार, रोहित मंत्रीवार, गजानन संकटवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय पुलकम्बर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रेम व्यक्ती यांनी मानले.

# आर्णीत प्रभाग क्र.५ मध्ये विकासकामांचा वेग

## नगरसेवक अशफाक शेख लावल्या समस्या मार्गी

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**आर्णी :** शहरातील प्रभाग क्रमांक ५ मध्ये विकासकामांचा धडाका सुरू झाला असून नवनिर्वाचित नगरसेवक अशफाक शेख यांनी नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यावर भर दिला आहे. निवडून आल्यानंतर त्यांनी प्रभागातील प्रलंबित प्रश्नांकडे तत्काळ लक्ष देत विविध कामांना गती दिली आहे.

आदर्श नगर परिसरात नाल्यांच्या कडेला वाढलेली झाडे, साचलेला कचरा व घाण जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली. तसेच रस्त्यांवरील खड्डे भरून दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. त्यामुळे परिसरात स्वच्छता आणि सुरक्षिततेची स्थिती सुधारू



लागली आहे.

कामाच्या ठिकाणी नगरसेवक अशफाक शेख स्वतः उपस्थित राहून पाहणी करत नागरिकांच्या अडचणी जाणून घेत आहेत. सुरू असलेल्या विकासकामांमुळे स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून नगरसेवकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे.

# राष्ट्रसंत सद्गुरु डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची जयंती

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**उमरखेड :** भक्ती, ज्ञानमार्ग आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधणारे राष्ट्रसंत सद्गुरु डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची १०९ वी जयंती येथे महात्मा बसवेश्वर संस्थानच्या शिव मंदिरात भक्तिभावाने साजरी करण्यात आली. विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी कार्यक्रमास उत्साहाचे स्वरूप लाभले.

वीरशैव लिंगायत धर्मजागृतीसाठी महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक राज्यांत त्यांनी व्यापक जनजागृती केली. विविध मठ व मंदिरांना भेटी देत प्राचीन साहित्य संकलित करून ते पुस्तक स्वरूपात प्रकाशित केले. त्यांच्या जीवनावर संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचा



प्रभाव होता. त्यातूनच ‘परमरहस्य’ ग्रंथ पारायण आणि अखंड शिवनाम सप्ताहाची परंपरा त्यांनी रुजविली.

अंधश्रद्धा निर्मूलन, सामूहिक विवाह, वृक्षारोपण, जलसंपदा संवर्धन, अस्पृश्यता निवारण, भ्रूणहत्या प्रतिबंध, रक्तदान, व्यसनमुक्ती आणि स्वच्छता या सामाजिक उपक्रमांत त्यांनी पुढाकार घेत लाखो भक्तांना प्रेरित केले. मराठी, कन्नड, संस्कृत, हिंदी, इंग्रजी, उर्दू आणि पंजाबी अशा सात भाषांतून ते प्रभावीपणे मार्गदर्शन करीत.

सन १९४५ मध्ये लाहोर विद्यापीठातून एमबीबीएस पदवी संपादन केलेले ते विद्वान संत होते. आयुष्यभर स्वावलंबन, साधेपणा आणि त्याग यांचा आदर्श त्यांनी जपला. कोणतीही भेटवस्तू स्वीकारली नाही; भक्तांनी अर्पण केलेला हारही ते भक्तांच्याच गळ्यात घालत असत. कार्यक्रमास प्रकाशअप्पा दुधेवार, बबनअप्पा पुरमे, नगरसेवक गजानन रासकर, प्रभाकर दिघेवार, अशोकअप्पा पुरमे, विनोद बिचेवार, दिलीप बिचेवार, डॉ. जवणे, बंडू कऱ्हाळे, बाबू दुधेवार, पांडुरंग साखरकर, शंकर पुरमे, शिवा दुधेवार, बाळू भोकरे, विजय दुधेवार, संतोष माधव हिंगमीरे, संतोष रामजी हिंगमिरे, सौरभ बिचेवार, प्रभाकर गांजरे, नवदीप बिचेवार, दिलीप गांजरे, सागर लाहेवार, विकास बिचेवार, लिलाबाई दुधेवार, छायाबाई दुधेवार, शोभाबाई सुकळे, कौसल्याबाई पुरमे आदींसह अनेक महिला-पुरुष भक्त उपस्थित होते.

## रेल्वे स्टेशनवरील पार्कींगचा ठेका...






# रद्द न करण्याचा करार !

# दादागिरीची तक्रार, मग्रुर ठेकेदार फरार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात असलेल्या पार्कींगचा ठेका मागील अनेक वर्षापासून एकाच ठेकेदाराला रेल्वे प्रशासन देत असल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. पार्कींगचा ठेकेदार हा वादग्रस्त असून त्याच्या पार्कींग करण्याच्या दादागिरीने वाशीम परिसरातील सर्व वाहनचालक परेशान झाल्याचे समजते. ठेकेदाराच्या दादागिरीला रेल्वेचे अधिकारी आणि रेल्वे पोलीसांचे आर्थिक पाठबळ असल्यामुळेच त्या ठेकेदाराकडून दररोज रेल्वे स्टेशनवर ये-जा करणाऱ्या वाहन चालकांची खुलेआम आर्थिक लूट सुरू असल्याचे वास्तव आहे. त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करण्यासाठी विविध सामाजिक संघटना व ग्राहक संघटनांनी पुढाकार घेतला असून एकत्र येणार आहेत. दादगिरीच्या ठेकेदारी रद्द करण्यासाठी अनेक तक्रारी केल्या असून रद्द न करण्याचा करार भ्रष्ट व ठेक्यात भागिदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी केला आहे. अनेक गुन्हे दाखल असूनही हा मग्रूर ठेकेदार फरार आहे.

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षापासून दुचाकी, तिनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्कींगची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. रेल्वे प्रशासनाने व अनेक वर्षापासून पार्कींगचा ठेका घेणाऱ्या वादग्रस्त ठेकेदाराने वाहनांच्या सुरक्षिततेसाठी टिनशेडची सुविधा सुद्धा उपलब्ध करुन दिली नाही. पार्कींगसाठी शेड नसल्यामुळे वाहन चालकांची दररोज पार्कींगमध्ये ठेवलेली वाहने उन्ह, वारा, पावसाचा त्रास सहन करत असल्याचे चित्र आहे. रेल्वेस्टेशन वर येणाऱ्या रेल्वे गाडीच्या वेळेवर अथवा वेळेच्या अगोदर प्रवाशांना, नातेवाईकांना आणून सोडण्यासाठी अथवा घेण्यासाठी येणाऱ्या आप्तेष्ठांना सुद्धा जबरीने, दादागिरी करून पार्कींगचा वादग्रस्त ठेकेदार वाहने पार्कींगमध्येच लावण्याची सक्ती करून वाहनचालक, मालकांची आर्थिक लूट करत आहे. रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमोर व स्टेशनवर ड्युटीवर असलेल्या पोलीस



अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संगनमतानेच वादग्रस्त ठेकेदाराची अरेरावी व दादागिरी खुलेआम सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.

रेल्वे पार्कींगचा ठेकेदार असलेल्या ठाकूरची गुन्हेगारीची पार्श्वभूमी असल्याची चर्चा आहे. पार्कींगचा ठेका घेण्याअगोदर ठाकूर ने रेल्वे आवाराच्या गेटला लागून असलेल्या एका गरीब व्यक्तीच्या जागेवर अतिक्रमण केले होते. त्या गरीब माणसाची जागा सोडण्यासाठी ठाकूरने दादागिरी करून त्या गरीब माणसाला खूप त्रास दिला होता. ठाकूरच्या जाचाला कंटाळून त्या गरीब माणसाला त्याच्या मालकीची आणि व्यवसायासाठी उपयोगी असलेली जागा कमी भावाने विकावी लागल्याची चर्चा आहे. रेल्वे स्टेशनच्या आवारात होणाऱ्या गुन्हेगारीच्या प्रकारात सहभागी असलेल्या आरोपींना सुद्धा वादग्रस्त ठेकेदाराची साथ असल्याचीही स्टेशन परिसरात चर्चा आहे. वाशीम शहर पोलीस ठाण्यात पार्कींगच्या वादग्रस्त ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याचे समजते. वाशीम शहर पोलीसांनी वादग्रस्त ठेकेदाराची कसून चौकशी केल्यास अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करावा तसेच पार्कींगसाठी टिनशेड उपलब्ध करून देण्याची मागणीही विविध सामाजिक संघटना आणि ग्राहक संघटनेने रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे समजते.

### यांनी केल्या तक्रारी....

ग्राहक पंचायतचे अध्यक्ष, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष, डी.आर.यु.सीसीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी, झेड.आर.यु. सीसीचे सदस्य सुरज चौधरी, प्रविण जाधव, शंकरराव इंगोले, गणेश पाथे, काशिनाथ शिंदे, सिध्दार्थ धाबे, किसन इंगोले, दिपक पांढरे, दिपक शिंदे, शुभम सोळंके, विठ्ठल मोरे, शुभम थोरात, संतोष खडसे, संतोष वानखेडे, सागर अगम, भारत घुगे, जयदेव इंगळे, राजु टोकळे, सुनिल गुडदे, हमीद बेनिवाले यासह शेकडो सामाजिक संघटनांनी व त्रस्त प्रवाशांनी तक्रार केली आहे.

## थोडक्यात

### श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह



●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

वाशीम मंगरुळपीर तालुक्यातील फाळेगाव व्यवहारे येथील महान तपस्वी संत लोटांगणे महाराज पर्णकुटी संस्थान, श्री क्षेत्र फाळेगाव व्यवहारे येथे १८ ते २८ फेब्रुवारी दरम्यान भव्य श्रीमद् भागवत कथा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सप्ताहाची सांगता २८ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाने होणार आहे.

यावेळी माधव श्रीमद्भागवतमहापुराणम् बाबा इंगोले (आळंदी देवाची), महंत सिद्धनाथ बाबा (गांगलवाडी), महंत शांतपुरी महाराज (येवता), महंत शांतिगिरी बापू (खंडाळा, मुंबई), महंत विठ्ठलगिरी महाराज सप्ताहादरम्यान मूर्ती स्थापना व कळशरोहण सोहळा, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन महोत्सव तसेच अखंड हरिनाम सप्ताह असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. यामध्ये राज्यभरातील नामवंत (पंढरपूर), महंत रमेश महाराज (लहूळ) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थि होते. १८ ते २३ फेब्रुवारी पर्यंत विविध महाराजांचे कीर्तन पार पडत असून २४ फेब्रुवारी रोजी धर्मगुरू अमृत आश्रम, बाळू महाराज गिरगावकर, २५ फेब्रुवारी रोजी अजय महाराज महाजन, बाबूराव महाराज तडसे, २६ फेब्रुवारी रोजी सोपान महाराज सानप, २७ फेब्रुवारी रोजी ज्ञानेश्वर महाराज चौधरी, निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, २८ फेब्रुवारी रोजी माधवबाबा इंगोले यांचे कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. १८ फेब्रुवारी रोजी श्रींच्या मूर्तीची भव्य मिरवणूक व प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून मूर्ती स्थापना व कळशरोहण सोहळा संत महंतांच्या उपस्थितीत पार पडला. कीर्तन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील सर्व भाविक भक्तांनी महाप्रसाद व इतर धार्मिक कार्यक्रमांचा लाभघ्यावा, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

### मराठी भाषा गौरव दिवस




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात दिनांक २७.०२.२०२६ रोजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे, प्रमुख अतिथी डॉ.सुनील राठोड, डॉ.शरद वाघोळे, डॉ. संजय इंगळे, डॉ.पवार सर, डॉ. ताकतोडे, प्रा.राठी मॅडम यांच्या उपस्थित लाभली होती.

यावेळी मराठी भाषा व तिचे महत्व व गौरव वाढविण्यासाठी मराठी व्यक्तीने ती प्रथम बोलली पाहिजे. त्यातून ग्रंथ निर्मिती केली पाहिजे. आपला सर्व जीवन व्यवहार व्यक्त केला पाहिजे असे विचार व्यक्त केल. प्रचार डॉ.राहुल सुर्वे यांनी आपल्या मनोगतामधून मराठी भाषेचे महत्व विषद केले. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठी विभागाच्यावतीने महाविद्यालयात निबंध स्पर्धा आयोजित केली होती त्यामध्ये एकूण २५ विद्यार्थांनी आपला सहभाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे, डॉ.प्रमोद देवके, प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी यांची उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.शरद वाघोळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. देवके सर तर सूत्र संचलन कु. मुळे यांनी केले.

### ठेकेदार व अधिकारी पैशासाठी लाचार...

# दाभडी येथील सडक योजनेत भ्रष्टाचार !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

दाभडी येथील श्रीक्षेत्र संत राघोजी महाराज संस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असताना गंभीर अनियमितता उघडकीस येत आहे. अधिकारी व ठेकेदार पैशासाठी लाचार झाले असून देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार करीत आहेत. त्यामुळे जनाची नाहीतर मनाची लाज बाळगून अधिकारी व ठेकेदारींनी रस्त्याचे काम चांगले करावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

रस्त्याच्या साईट पट्टीवर मुरूमऐवजी



दगड व काळ्या मातीचा वापर सर्रास सुरू असून अंदाजपत्रकाला हरताळ फासण्यात येत आहे. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

याबाबत महिला सरपंच सौ. लताताई

### रस्त्याच्या साईट पट्टीवर काळ्या मातीचा वापर

भागवत महल्ले यांनी वाशिम जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असतानाही अद्याप ठोस कारवाई नाही. दररोज शेकडो भाविकांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर प्रशासन डोळेझाक करत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत परमहंस झोलेबाबा विद्यालयाच्या यशाचा तिहेरी झेंडा !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरुळपीर येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व.मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय यांनी पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. या प्रतिष्ठेच्या परीक्षेत विद्यालयातील तीन विद्यार्थी वंश कुंडलिक वर, संदेश रमेश तायडे व सम्यक शुद्धोधन तायडे हे चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले असून, त्यांनी



घवघवीत यश मिळवले आहे. या यशामुळे विद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल अशा कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुशिल सपकाळ व मुख्याध्यापक सुनिल सपकाळ व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पिंप्री अवगण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले .

# आज वाशिममध्ये विशाल हिंदू संमेलन !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून संपूर्ण देशभर हिंदूसंमेलने आयोजित करण्यात येत आहेत. त्या अंतर्गतच वाशिम येथे शनिवार दिनांक २८/२/२०२६ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत स्थानिक परशुराम भवन येथे विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाला आशिर्वचन देण्यासाठी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.विद्यावाचस्पती श्री.श्रीहरी महाराज पितळे, मेहकर आणि ह.भ.प. सौ.रुख्मिनी माऊली शास्त्री ,वाशीम उपस्थित राहणार आहेत.

संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून विद्याभारती विदर्भ प्रांत सहमंत्री



विद्यावाचस्पती प्रा.दिलीपजी जोशी, वाशिम हे मार्गदर्शन करणार आहेत. हिंदू जागरणाला दिशा, नवीन ऊर्जा आणि नवचेतना देण्यासाठी आयोजित सकल हिंदूसंमेलनाला सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन सकल हिंदू संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# सेंद्रिय शेतीला मिळणार 'ग्रामरूट्स ऑरगॅनिक्स' चे बळ !

### कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते लोगोचे विमोचन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'वाशिम ऑरगॅनिक विकास संघ शेतकरी उत्पादक कंपनी कडून आता 'ग्रामरूट्स ऑरगॅनिक्स' या नावाने जिल्ह्यातील सेंद्रिय उत्पादणे विकली जाणार आहेत.

ग्रामरूट्स ऑरगॅनिक्स' या ब्रँड नावाच्या लोगोचा अनावरण




सोहळा राजधानी मुंबईत राज्याचे कृषिमंत्री मा.श्री.दत्तात्रय भरणेमामा यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. वाशिम मधील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन उभारलेल्या या शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून सेंद्रिय उत्पादनांचे ब्रँडिंग आणि मार्केटिंग आता प्रभावीपणे केले जाणार आहे. या प्रसंगी अॅग्रीकॉस स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी पुणेचे संचालक दिलीप ज्ञानदेव काशिद, वाशिम ऑरगॅनिक विकास संघाचे अध्यक्ष सुदर्शन जगदीशराव सरनाईक यांच्यासह कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमासाठी राज्याच्या माहिती व तंत्रज्ञान संचालिका श्रीमती.बुवनेश्वरी एस. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे माजी कुलसचिव डॉ. वंदनजी मोहड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ग्रामरूट्स ऑरगॅनिक्स' या ब्रँडमुळे आता वाशिम जिल्ह्यातील सेंद्रिय उत्पादनांना महानगरांच्या बाजारपेठेत मोठी संधी उपलब्ध होणार आहे. कृषिमंत्र्यांनी या नाविन्यपूर्ण प्रयोगाचे कौतुक करून हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

### मौजे चांधई येथे गरिबाच्या हक्काचं...

# राशन स्वस्त धान्य दुकानदाराच्या घशात !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर तालुक्यातील राशन दुकानदार लाभार्थींना धान्य पुरवठा व्यवस्थित करीत नसल्यास ची तक्रार उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या कडे चांधई या गावातील नागरिकांनी निवेदन निवेदनाद्वारे केली असून. महसूल विभाग चे दुर्लक्ष असल्याने. निवेदनात असे नमूद केले आहे की रासन दुकानदार (कंट्रोल डीलर) महिन्याला येऊन आमचे अंगठा घेतात व आम्हाला चार-पाच महिन्या पासून आम्हाला धान्य मिळत नसल्याची तक्रार सुद्धा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे. केली

या अगोदर अन्नपुरवठा अधिकारी यांच्या कडे तक्रार दिली होती पण त्यांनी कंट्रोल डीलर ला बोलावून त्यांच्याशी हात मिळवणी करून तक्रार रफादफा केली त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट



पसरली आहे दिनांक २७/२/२६ ला मंगरूळपीर तहसील कार्यालय उपविभागीय अधिकारी यांना गावकऱ्यांनी निवेदन दिले मौजे चांदई येथे सावित्रीबाई फुले महिला बचत गट चांदई मार्फत कल्पना संजय नितनवरे स्वस्त धान्य दुकानदार आहे हे वितरक आम्हाला सीधा धान्य वितरण पुरवठा वितरण करतात परंतु त्यांनी मागील ३ ते ४ महिन्यापासून आम्हाला सीधा धान्य पुरवठा केलेला नव्हता आम्ही अन्न पुरवठा विभाग तहसील कार्यालय मंगरूळपीर या विभागात सीधा पुरवठा होत नसल्याबाबत वितरकाने मनमानी कारभार बाबत अधिकाऱ्यांना लेखी सूचना दिल्या परंतु आमच्या अर्जाची साधी दखल तर सोडा अद्याप पर्यंत अर्जाचा विचार सुद्धा झालेला नाही मागील तीन महिन्यापासून आम्हाला एक ही किलो धान्य पुरवठा झालेला नाही आम्ही धान्य घेण्यास गेलो असता जर तर चे उत्तर मिळते मशीन चालू नाही माल उपलब्ध नाही आम्हाला वरून धान्य पुरवठा नाही असे विविध कारणे आम्हास धान्य पुरवठा नाकारण्यात येतो आम्ही यांचे दुकानावर गेलो असता मोठ्या तोराने वागतात आम्हाला धमकी देतात तुम्ही जर बोलले तर तुमच्या नावे खोटे गुन्हे दाखल करू अशी दमदाटी रासन दुकानदार लाभार्थींना देतात तरी निवेदनात मागणी केली की आम्हाला वितरकांचा त्रास नको असून यांचा दुकानाचा परवाना रद्द करून दुसऱ्या कोणत्या ही व्यक्तीला देण्यात यावे जेणे करून आम्हाला धान्य पुरवठा होईल पुरवठा अधिकारी कोणत्याही गोष्टी किंवा तक्रार आम्ही दिल्यास ती म्हणते की मी बिमार आहे मी नवीन आहे मला काही माहिती नाही माझी बीपी हाय होते तुम्ही मला त्रास देऊ नका अशा प्रकारे उडवा उडवीचे उत्तरे देऊन वापस पाठवतात रेशन दुकानदार काळ्या बाजारात सर्व धान्य विकुन टाकते तक्रार केली आय ओ शी हाथ मिळवणी करून घेतले जातात आम्हाला अंगठा घेऊन सुद्धा धान्य दिले जात नाही याची सखोल चौकशी होऊन आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी सुद्धा केली आहे.

### जे.सी.हायस्कूल मध्ये ...
### मराठी भाषा गौरव दिन' साजरा

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

येथील जे.सी.हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' आणि कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध विनोदी साहित्यिक अशोक मानकर सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य भारत हरसुले होते, तर पर्यवेक्षक प्रशांत गंधक यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये 'मी मराठी भाषा बोलते' या एकपात्री प्रयोगातून इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी कु.ओवी विजयकुमार काष्ट्ये हिने मराठी भाषेचा उगम, वैभव आणि आजची स्थिती याचे प्रभावी सादरीकरण केले. तसेच इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक भान जपत 'प्लास्टिक मुक्ती' चा संदेश देणारी भारूड नाटिका सादर केली, ज्याला



उपस्थितांची मोठी दाद मिळाली. या भारुड नाटिकेत नंदिनी देसाई, निधी तवले, देवांगी ठाकरे, निधी मते, आराध्या रुईवाले, गौरी नवघरे, ऋतुजा भुसाटे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्येगोजिरी माहुलकर, आस्था जाधव, पूर्वी डहाके, मोनिष्का वक्ते, अक्षरा माहुलकर, गुंजन थेर, वेदांत राठोड, धनश्री नंदे, श्रीहरी गावंडे, समान्वी आठवले, प्रणिती मोरे, स्वराली मेहेर, जागृती होलोपकार, अनुष्का भोजापुरे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शिक्षिका रिता वैद्य व इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कु.गोजिरी गुळकरी यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# लाडकी बहीण योजना तळीरामांच्या पथ्यावर...

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

## ◆ महसूल वाढवण्यासाठी ड्राय डे च्या संख्येत घट!



**अकोला :** लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून शासनाच्या तिजोरीवर आर्थिक बोझ वाढला आहे. त्यामुळे तिजोरी भरण्यासाठी सरकार महसूल वाढवण्यासाठी नवीन नवीन क्लुप्त्या शोधून काढत आहे. आता त्यासाठी ड्राय डे ची संख्या कमी करण्याची तयारी सुरू झाली आहे. राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या म्हणण्यानुसार वर्षातील आठ दिवस असे असतात, ज्या दिवशी संपूर्ण राज्यात दारू विक्री बंद असते. हा नियम पुढेही लागू राहील याव्यतिरिक्त ज्या दिवशी दारू विक्री बंद ठेवायची असेल त्याचा निर्णय जिल्हाधिकारी घेतात. प्राप्त माहितीनुसार गांधी सप्ताहात दोन दिवस दारू विक्री बंद राहायची परंतु आता त्यातील एक दिवस कमी करण्यात आला आहे. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, ३० जानेवारी महात्मा गांधी पुण्यतिथी, एक मे महाराष्ट्र दिन, आषाढी एकादशी, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन, अनंत चतुर्दशी, २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती आणि कार्तिक एकादशी या आठ ड्राय डे व्यतिरिक्त होळी, मोहरम, आणि गांधी सप्ताहाचा शेवट हे दिवस देखील ड्रायडे आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गांधी सप्ताह २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर पर्यंत चालतो २ ऑक्टोबर व्यतिरिक्त ८ ऑक्टोबर हा देखील ड्राय डे आहे. परंतु यात आता सुधारणा करण्यात आली आहे ८ ऑक्टोबर हा आता ड्राय डे राहणार नाही. मोहरम रोजी ड्रायडे पाळायचा की नाही हे जिल्हाधिकारी ठरवू शकतील. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या अहवालानुसार हा निर्णय घेतला जाईल. या अहवालात दारू विक्रीचा कायदा आणि सुव्यवस्थेवर परिणाम होईल का हे देखील नमूद केले जाईल. मागील काही वर्षांपासून सरकारच्या काही निर्णयामुळे जसे की हायवे वरून १०० मीटरच्या आत असलेली दारूची दुकाने बंद करण्याचा निर्णय असो किंवा कोरोना काळात संपूर्ण दारूबंदी केल्यामुळे दारू विक्रेत्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यातच आता सरकारने दारूच्या किमती भरमसाठ वाढवून ठेवल्या आहेत. आणि ड्राय डे ची संख्या वाढल्यामुळे दारू विक्रेता लॉबीचा नुकसान भरपाईसाठी सरकारवर दबाव वाढत चालला आहे. ड्राय डे च्या दिवशी नकली दारूची विक्री मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे सरकारचा महसूल कमी होऊ नये म्हणून सरकारने ड्राय डे ची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला असावा. एकीकडे लाडकी बहीण योजनेमुळे महिलांमध्ये खुशीचे वातावरण आहे. तर दुसरीकडे ड्राय डे च्या दिवशी दारू घेण्यासाठी इतरत्र फिरणाऱ्या व जास्त दराने दारू विकत घेणाऱ्या तळीरामांना सुद्धा ड्राय डे ची संख्या कमी करून सरकार खुश करण्याच्या तयारीत आहे

# रमजान महिना उपवासामुळे सुकामेवा खातोय भाव!

## बदाम, काजू आणि खजूरला अधिक मागणी

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी



**अकोला :** मुस्लिम बांधवांचा सर्वात पवित्र रमजान महिना सुरू झाल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळत आहे. रमजान महिना आल्यावर सर्वांनाच शीरखुर्माची आठवण येते. परंतु शीरखुर्माला अधिक पौष्टिक बनवण्यासाठी लागणारा सुकामेवा मात्र यंदा चांगलाच भाव खात आहे. रमजान महिन्यात महिनाभर रोजा अर्थात उपवास ठेवला जातो. उपवासासाठी शरीरात ऊर्जा टिकून ठेवण्यासाठी उपवासासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या सुक्या मेव्याची मागणी वाढली आहे. दिवाळीपासून सुक्या मेव्याचे दर स्थिर होते. परंतु रमजानच्या उपवासामुळे शहरात सुक्या मेव्याला मागणी वाढली असून सुक्या मेव्याच्या भावात किंचित दरवाढ झाली आहे. तरीसुद्धा सुक्यामेवाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सुकामेवा विक्रेता सांगत आहेत. शहरातील बाजारपेठेत विविध प्रकारचा सुकामेवा उपलब्ध झाला आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे खजूरची मागणी वाढली आहे. खजूर हे थंड आणि शरीरात रक्त वाढीचे काम करते त्यामुळे खजूर या दिवसात आवर्जून खाल्ली जाते. रमजान महिन्याचे उपवास सुरू होऊन दहा दिवसापेक्षा अधिक कालावधी उलटल्यानंतरही सुक्या मेव्याची मागणी वाढते आहे. यावर्षी बेदाणा आणि खोबरे वगळता बहुतांश प्रकारच्या सुक्या मेव्याचे दर स्थिर आहेत. नवीन खोबऱ्याचा हंगाम सुरू झाला नसल्यामुळे आवक कमी आहे त्यामुळे खोबऱ्याचे दर वाढले आहेत. रमजानच्या उपवासासाठी आवश्यक खजूर, काजू बदाम चारोळी पिस्ता अंजीर, अक्रोड, केशर, खोबरे, चारोळी आदीला विशेष मागणी असते अकोला शहरात इराण इराक ऑस्ट्रेलिया येथून बदाम तर काजूची भारतासह आफ्रिका इथून आवक होते. सौदी अरेबिया आणि अफगाणिस्तान येथून खारीक, इराण मधून पिस्ता, भारतातील तामिळनाडू कर्नाटक व केरळ येथून खोबऱ्याची आवक होत आहे. सध्या शहरात सुक्या मेव्याचे किलोचे दर अशा प्रकारे आहेत खजूर ७० ते २३० रुपये किलो, खोबरे २२० ते ३३०, बदाम ६८० ते १२००, काजू व अंजीर ९०० ते १२०० रुपये किलो, चारोळी ८०० ते १२०० रुपये तर पिस्ता १९०० ते २६०० रुपये किलो दराने विकला जात आहे. सुक्या मेव्याचे भाव जरी कडाडले असले तरी रमजान महिना असल्याने शरीरात ऊर्जा टिकून ठेवण्यासाठी जो तो आपापल्या परीने सुकामेवा खरेदी करून रमजान महिना उत्साहात साजरा करीत आहेत

# 3 मार्च रोजी खुले नाट्यगृहात मूर्ख संमेलन

## मूर्खाधिराज' विशाल प्रदीप शर्मा यांची मिरवणूक

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी



**अकोला :** होलिकोत्सवानिमित्त शहरात ५४ वे 'मूर्ख सम्मेलन' मंगळवार, ३ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहात होणार आहे.


हास्य-व्यंगावर आधारित सांस्कृतिक सोहळा 'मूर्खता अमर आहे' ही संकल्पना जोपासत आहे. परंपरेची सुरूवात ज्येष्ठ पत्रकार स्व. रामकिशोर श्रीवास (गुरुजी) यांनी केली. आता डॉ. प्रा. कोमल राजेंद्र श्रीवास ती उत्साहात पुढे नेत आहेत. कार्यक्रमापूर्वी दुपारी ४ वाजता 'मूर्खाधिराज' विशाल प्रदीप शर्मा यांची विराट मिरवणूक सिटी कोतवालीच्या मागील भागातून प्रारंभ होऊन कापड बाजार, जैन मंदिर, गांधी चौक, महानगरपालिका आणि प्रमिलाताई ओक हॉल मार्गे खुले नाट्यगृहात दाखल होणार आहे. या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सम्मेलनात विविध कलाकारांकडून हास्य-व्यंग्य, लावणी, नृत्य, कॉमेडी, जादूचे प्रयोग तसेच 'बिना शादी का लड़का (कुंवारा)' या नाटिकेचे सादरीकरण करण्यात येणार आहे. अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांचे समूहगीत आणि 'होली धमाका' कार्यक्रम हे विशेष आकर्षण ठरणार आहेत. वेळ व परिस्थितीनुसार कार्यक्रमात बदल होऊ शकतो तसेच कोणतीही अभद्र प्रस्तुती रद्द करण्यात येईल, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

कार्यक्रमाचे नियंत्रक म्हणून सर्वेशचंद्र कटियार कार्यरत असून कार्यक्रमाचे संचालन व उद्घोषणा प्राचार्य डॉ. रामप्रकाश वर्मा करणार आहेत. हास्य, व्यंग्य आणि सामाजिक संदेशाचा सुरेख संगम असलेले हे 'मूर्ख सम्मेलन' अकोल्याच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग ठरले असून यंदाही नागरिकांसाठी मनोरंजनाची पर्वणी ठरणार आहे.

# खडकी परिसरात सुरू होता देहविक्रीचा अड्डा

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

## ◆ पोलिसांनी तीन महिलांसह एका पुरुष ग्राहकाला केली अटक



**अकोला :** खदान पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या खडकी परिसरातील एका फ्लॅटमध्ये गेल्या काही दिवसांपासून देहविक्रीचा व्यवसाय सुरू होता. प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी ईशानी आनंद यांनी शुक्रवारी खडकी परिसरात धाड टाकून या बेकायदेशीर व्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत ३ महिलांसह एका पुरुष ग्राहकाला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खडकी परिसरातील एका फ्लॅटमध्ये हा देहविक्रीचा अड्डा चालवला जात होता. प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी ईशानी आनंद यांना खबऱ्यामार्फत याबद्दलची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे शुक्रवारी त्यांनी या फ्लॅटवर अचानक छापा टाकला. या घरात बेकायदेशीरपणे देहविक्रीचा व्यवसाय केला जात असल्याचे समोर आले. पोलिसांनी घटनास्थळावरून हा व्यवसाय चालवणाऱ्या महिलेसह इतर २ महिला आणि एका पुरुष ग्राहकाला ताब्यात घेतले आहे. कारवाई सुरू असताना परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. या सर्व आरोपींना पुढील कारवाईसाठी खदान पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या संपूर्ण कारवाईबाबत खदान पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांनी सविस्तर माहिती दिली.

# थकित करापोटी पूर्व झोनमधील दोन मालमत्ता सील

## ◆ ११ लाखांहून अधिक थकबाकीदारावर कठोर पाऊल



प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला :** महानगरपालिकेच्या पूर्व झोन अंतर्गत थकीत मालमत्ता करापोटी दोन मालमत्तांवर सीलची कारवाई करण्यात आली आहे. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली.

२७ फेब्रुवारी रोजी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहायक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व झोनमध्ये कारवाई करण्यात आली.राज सरोवर, सातव चौक, जठारपेठ अकोला येथील वार्ड क्रमांक अ ३ मधील मालमत्ता क्रमांक २३६०, मालक रंजीत राठोड यांच्याकडे सन २०१८-१९ पासून आजपर्यंत एकूण ५४ हजार ३०१ रुपये मालमत्ता कर थकीत असल्याने संबंधित फ्लॅटला सील लावण्यात आली. तसेच हर्ष संकुल कॉम्प्लेक्स, अकोला येथील वार्ड क्रमांक अ १ मधील मालमत्ता क्रमांक २३०, मालक विक्रम राजूरकर यांच्याकडे सन २०१७-१८ पासून आजपर्यंत तब्बल ११ लाख ४ हजार ९७० रुपये मालमत्ता कर थकीत असल्याने संबंधित फ्लॅटवरही सीलची कारवाई करण्यात आली. या कारवाईत जप्ती पथक प्रमुख सुधीर मिसुरकर तसेच कर वसुली लिपिक संतोष राजे, शुभम रील, राजेश साळुंखे, संतोष पांडे, दीपराज महल्ले, संतोष वेले, जय मोरे, विठोबा दळु, गणेश पद्मने आणि सुरक्षा रक्षक संगीता शिंदे आदी उपस्थित होते.

# एनसीएमसी कार्ड काढण्यासाठी वृद्धांच्या रांगा

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

## ◆ बसस्थानकात वृद्ध व्यक्तींना प्रतीक्षा



**अकोला :** एसटी प्रवासात सवलत घेण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) बंधनकारक करण्यात आले आहे. महिला, दिव्यांग, वृद्ध व्यक्तींसाठी कार्ड शिवाय सवलत मिळणार नाही. नवीन बसस्थानकात कार्डांचे वितरण करण्यात येत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वितरण केले जात आहे.

शनिवारी सकाळ पासून नवीन बसस्थानकात कार्डसाठी अक्षरशः रांग लागली होती. काउंटर उघडण्याची ते वाट पाहत होते. तीन महिने पर्यंत कार्ड वितरण सुरू राहणार आहे. मात्र नवीन कार्ड शिवाय सवलत मिळणार नाही ही बाब लक्षात घेऊन लाभार्थी घाई करीत आहेत. त्यांना बसस्थानकात तिष्ठत राहावे लागू नये याबाबत आगार प्रमुखांनी लक्ष घालण्याची गरज आहे.

### कधी पासून आवश्यक, अद्याप माहिती नाही

◆ एनसीएमसी कार्ड वितरीत करण्यात येत आहेत. परंतु ते कधी पासून बंधनकारक राहील याविषयी डेडलाईन स्पष्ट नाही. त्यामुळे सध्या तरी पूर्वीच्या पद्धतीने प्रवास करता येईल. मात्र लाभार्थींनी एनसीएमसी कार्ड तातडीने काढून घ्यावे.

**सुभाष भिवटे**, आगार व्यवस्थापक



## राणी सतीधाम मंदिरात सोमवारी होळी का दहन

**अकोला :** शहरातील मध्यभागी स्थित राणी सती धाम येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. फाल्गुन शुक्लपक्ष पौर्णिमेच्या पर्वावर सोमवार, २ मार्च रोजी रात्री ८ वाजता राणी सती धाम परिसरात हा होळी दहन उत्सव होणार असून यामध्ये जळत्या होळीत होलिका भक्त प्रल्हादला मांडीवर घेऊन होळीत जळत असल्याची नयनरम्य झांकी साकारण्यात करण्यात आली आहे.

# होळीच्या चाकोल्या नामशेष होण्याच्या मार्गावर

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी



**अकोला :** रंगोत्सवाची चाहूल लागताच गावागावांत होळीच्या तयारीला सुरुवात होत असे. अंगणात गाईच्या शेणाचा सुगंध दरवळायचा आणि वृद्धांसह चिमुकल्यांची लगबग पाहायला मिळायची. कारण होळी म्हटले की शेणापासून तयार होणाऱ्या 'चाकोल्या' ही विदर्भातील एक आगळीवेगळी लोकपरंपरा होती; मात्र आधुनिकतेच्या वाढत्या प्रभावामुळे ही परंपरा हळूहळू लुप्त होत चालल्याचे चित्र दिसून येत आहे.

पूर्वी होळीच्या काही दिवसांपूर्वीच घराघरांत चाकोल्या बनवण्यास सुरुवात होत असे. लहान मुले उत्साहाने शेणाचे छोटे गोळे करून त्यांना चपटे आकार देत आणि मध्यभागी ओवण्यासाठी पाडत. उन्हात वाळल्यानंतर या चाकोल्यांच्या माळा तयार केल्या जात आणि होळी पूजनाच्या वेळी त्या होळीत अर्पण केल्या जात. ही परंपरा केवळ धार्मिक विधीपुरती मर्यादित नव्हती, तर कुटुंबीय व शेजाऱ्यांमधील स्नेह वृद्धिंगत करणारा सांस्कृतिक सोहळाही होता. आज मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे या चालीरीती विस्मरणात जात आहेत.



### चाकोल्या व गौऱ्यांच्या किमतीत वाढ

◆ होळी उत्सवाला अवघे दोन दिवस शेष राहिले आहे. नोकरवर्ग व बाहेरगावी कार्य करणारे नागरिकांनी करिता होळीला लागणारे चाकोल्या व शेणाच्या गवऱ्या शहरातील काही भागात व दुकानात विक्रीसाठी उपलब्ध आहे. याच्या चाकोल्यांची एक माळ ३० रुपया पासून ५० रुपया पर्यंत विक्री केली जात आहे. तसेच एक गवरी १० नग ६० रुपये ते ८० रुपये पर्यंत विक्री होत आहे.

### नव्या पिढीला माहिती नाही

◆ आज मात्र पंचवीस - तीस वर्षांपूर्वीच्या होळीच्या तुलनेत परिस्थिती पूर्णतः बदलली आहे लाकडांच्या होळया उभ्या राहत असल्या तरी गावांमध्येही घरोघरी चाकोल्या तयार होताना क्वचितच दिसतात. नव्या पिढीला या परंपरेची माहिती नसल्याची खंत ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक व्यक्त करीत आहेत.

# शहरात पाण्याचा अपव्यय

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी

**अकोला :** शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वेगवेगळ्या भागात जलकुंभांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावरून वेगवेगळ्या भागांना ठराविक दिवसी पाणी पुरवठा करण्यात येतो. ज्या दिवशी नळ येतात त्या दिवशी त्या भागात रस्त्यावरून पाण्याचे लोट वाहताना दिसतात. अनेक जण याच पाण्याचे वाहने धुतात, काही पाळी कुत्र्यांना आंघोळी घालतात. तर अनेक जण सर्व्हिस लाइनमध्ये पाण्याचा पाइप सोडून देतात. हा पाइप नळ जाईपर्यंत सर्व्हिस गल्लीत सोडलेला असतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होताना दिसून येत आहे. याकडे लक्ष देऊन पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# चार पोलीस कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर शेकडो प्रवाशांची सुरक्षा

## ◆ अकोला मुख्य बस स्थानकावरील दोन पोलीस चौकीपैकी केवळ एकच कार्यरत

प्रतिनिधी २८ फेब्रुवारी



**अकोला :** खाजगी वाहनांच्या तुलनेत एसटी बसचा प्रवास अधिक सुरक्षित व सोयीस्कर मानला जातो. त्यामुळे अकोला शहरातील मुख्य एसटी बस स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी जिल्ह्यातील तसेच राज्यातील विविध शहरांकडे प्रवास करीत असतात. प्रवाशांना सुरक्षित, सुलभ व अडथळारहित प्रवास मिळावा यासाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. सुरक्षित प्रवासाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या 'लाल परी' (एसटी बस) कडे प्रवाशांचा ओढा सातत्याने वाढत असतानाच, अकोला मुख्य बस स्थानकावरील सुरक्षा व्यवस्थेबाबत मात्र गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

सध्या मुख्य बस स्थानक परिसरातील शेकडो प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी अवघ्या चार पोलीस कर्मचाऱ्यांवर असून, संपूर्ण आगाराची सुरक्षा ही हेच चार कर्मचारी सांभाळत आहेत. विशेष म्हणजे, बस स्थानकावर असलेल्या दोन पोलीस चौकींपैकी केवळ एकच चौकी सध्या कार्यरत आहे. दिवस-रात्र प्रवाशांची वर्दळ, महिला, वृद्ध, विद्यार्थी व लहान मुलांची मोठी संख्या लक्षात घेता, ही अपुरी सुरक्षा व्यवस्था अपघात, चोरी, भांडणे किंवा अन्य अनुचित घटनांना आमंत्रण देणारी ठरू शकते, अशी भावना प्रवाशांमधून व्यक्त होत आहे. बस स्थानकासारख्या संवेदनशील ठिकाणी पोलीस मनुष्यबळ वाढवणे, दोन्ही चौक्या सुरू करणे तसेच सतत गस्त व्यवस्था प्रभावी करणे आवश्यक असल्याची मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन प्रवाशांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK